# हत्ती
# कधीच विसरत नाहीत



Wildlife Trust of India
www.wti.org.in

UN DECADE OF EDUCATION FOR SUSTAINABLE DEVELOPMENT
DÉCENNIE DES NU POUR L'ÉDUCATION EN VUE DU DÉVELOPPEMENT DURABLE
2005-2014

2011-2020
United Nations Decade on Biodiversity

IFAW.org
INTERNATIONAL FUND FOR ANIMAL WELFARE

### शिकण्याचे उद्देश:
या कार्यक्रमाचे विभिन्न भाग पाठ, विज्ञान, सामाजिक शिक्षण, भाषा व कलेच्या शिक्षणात सहयोग करतील. कार्यक्रमाच्या अन्य उद्देशांव्यतिरिक्त विद्यार्थी जीव विज्ञानाची संकल्पना समजुन घेतील, अभिनयाचे संचालन करणे, सार्वजनिक प्रस्तुतीकरण व अनेक असे कार्यकलाप शिकतील, ज्यामुळे कोणत्याही मुद्याची समज वाढेल व त्यावर वेगवेगळे विचार व्यक्त करण्यास पाठबळ मिळेल.

### स्त्रोत:
वाचनाची सामग्री - हत्ती कधीच विसरत नाही.

३. परिचय
४. मोठेपण ही फक्त सुरुवात आहे.
५. हत्तींची महत्त्वपूर्ण भूमिका
६. फिरण्यासाठीचे भूभाग
७. हत्ती आणि आपण
८. हत्तींसोबत अडचणी
९. हत्तींना वाचवणे
१०. शब्दार्थ

### पाठ्य योजना व कार्यतक्ता
११. पाठ-१ - माहिती वाढवणे, व्हिडीओ व पाठ्य सामग्री
१२. कार्यतक्ता-१ - बघण्या-वाचण्यासाठी तक्ता
१३. व्हिडीओ प्रश्नमंजुशा
१४. पाठ-२ - नैसर्गिक निवास स्थानाबद्दल समजणे - अनुकरण, अभिनय
१५. पाठ-३ - हत्ती व पर्यावरणाचा संबंध
१६. पाठ-४ - विवरणावर प्रतिक्रिया
१७. कार्यतक्ता-२ - हत्तींना वाचवणे
१८. पाठ-५ - संकटग्रस्त प्राण्यांसोबत तुलना
१९. पाठ-६ - चूक कोणाची आहे.
२०. हैंडआऊट (पत्रक) - वृत्तपत्रासाठी काल्पनिक कथा.

### कंपैनियन डीव्हीडी/मदतीसाठी डीव्हीडी:
हा शैक्षणिक व्हिडीओ जवळ-जवळ १८ मिनिटाचा असून तो छोट्या मुलांसाठी उपयुक्त आहे. या डीव्हीडीमध्ये कार्यक्रमाच्या सर्व सामग्रीच्या पीडीएफ फाईल सुध्दा दिलेल्या आहेत.

### ऑनलाईन स्त्रोत:
आईएफडब्ल्यू - डब्ल्यूटीआई च्या ॲनिमल एक्शन एज्युकेशन प्रोग्रामच्या जवळ वन्यजीव व पर्यावरणासंबंधी माहितीची अनेक साधने उपलब्ध आहेत. आमच्या फेसबुक ग्रुपला संपर्क साधा, ट्वीटर वर आमचे फॉलोअर व्हा किंवा न्यूज लेटरसाठी साईन अप करा www.wti.org.in, aae@wti.org. in वर संपर्क साधा.

### वन्य प्राण्यांसाठी केली जाणारी कारवाई/कामासंबंधी शिक्षण:
आंतरराष्ट्रीय वन्यप्राणी कोश (आईएफएडब्ल्यू) दरवर्षी वन्यप्राणी व पर्यावरणावर एक नवीन (शैक्षणिक) कार्यक्रम राबवित असतो. शैक्षणिक सामग्री स्थानीय स्तरावर परावर्तीत करुन १५ देशांमध्ये निशुल्क वाटली जाते, जी दरवर्षी जगभरात ५० लाख मुलांपर्यंत पोहचवली जाते. हा कार्यक्रम व अन्य कार्यक्रमांचे संपूर्ण स्त्रोत www.Ifaw.org/ education वर ऑनलाईन उपलब्ध आहे. आईएफडब्ल्यू भारतात त्याचा सहयोगी डब्ल्यूटीआई व एनिमल एक्शन एज्युकेशन प्रोग्राम बद्दल अन्य माहितीसाठी aae@wti.org.in वर ईमेल करा अथवा डब्ल्यूटीआईच्या ऑफिस ०१२०४१४३९०० वर फोन करा किंवा ०१२०४१४३९३३ वर फॅक्स करा.

IFAW.org
INTERNATIONAL FUND FOR ANIMAL WELFARE

### या कार्यक्रमाचा उपयोग कसा करणार:
'हत्ती कधीच विसरत नाही' चा उद्देश आहे, विद्यार्थ्यांना जंगली हत्ती व आपल्या या जगात त्यांची विशिष्ट भूमिका याची माहिती देणे. ज्यामध्ये जैवविविधता, नैसर्गिक निवासस्थान व पर्यावरणाचे विषय आहेत. त्याचबरोबर अशा अडचणी व इतर मुद्दे ज्यांचा सामना हत्ती कसा करतात यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाला शिकवण्याची सोपी पध्दत:

१. **विषयाचा परिचय व साधनांची माहिती तयार करणे:**
व्हिडीओ (डिव्हीडीवर), पाठयोजना-१, कार्यतक्ता-१, व्हिडीओ प्रश्नोत्तर

**अ) व्हिडीओ बघणे:**
पृष्ठभूमी तयार करण्यासाठी व विद्यार्थ्यांना माहित असलेली हत्तींची माहिती परत आठवण्यासाठी आपल्या वर्गासोबत व्हिडीओ बघा. व्हिडीओ बघत असतांना विद्यार्थी कार्यतक्ता-१ चा प्रयोग करु शकतात कारण महत्त्वपूर्ण शब्दावलीच्या आधारे पृष्ठभूमी तयार करता येईल. व्हिडीओ बघीतल्यानंतर विद्यार्थ्यांसोबत व्हिडीओ प्रश्नोत्तरी हा खेळ खेळू शकतात व त्यांनी जे शिक्षण आत्मसात केलं त्यावर विचार विनिमय करु शकतात.

**ब) पाठ्य सामग्री वाचणे:**
या पुस्तकाची पाठ्यसामग्री वाचण्यासाठी व विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी पाठ-१ च्या सुचनांचे पालन करा; विद्यार्थी वाचत असतांना कार्यतक्ता-१ वर महत्वपूर्ण शब्दावलीशी संबंधीत माहतीचे टिपण करु शकतात.

२. **पाठात दिलेल्या कार्यकलापांचे संचालन:**
शिक्षणाची सुची: पाठ्य सामग्रीची पाने: पाठ योजना व कार्यशाळा.

- पाठ-२ नैसर्गिक निवासस्थान नष्ट होणाऱ्या घटनांची माहिती घेणे व हत्तीबद्दल सहानुभूती व्यक्त करणाऱ्या घटनांवर केंद्रीत आहे.
- पाठ-३ मध्ये अशी कार्ये आहेत की ते हत्ती, जैवविविधता व इतर प्राण्यांमधील परस्पर संबंध समजण्यासाठी मदत करतील.
- पाठ-४ व कार्यतक्ता-२ हत्तींना वाचवण्यासाठीची एक कहाणी व त्याचबरोबर लिखित अभिनयावर आधारित व विचार विनिमयावर केंद्रीत वेगवेगळी कार्यकलाप आहेत.
- पाठ-५ पाठ्यसामग्रीमध्ये वर्णन केलेल्या विषयांवर विचार करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो. ज्यामुळे विद्यार्थी हत्तींवर येणाऱ्या संकटांचे वर्गीकरण करु शकतील. त्याचप्रमाणे अन्य प्राण्यांच्या संकटांसोबत हत्तींवर येणाऱ्या संकटांची तुलना करतील.
- पाठ-६ वृत्तपत्रासंबंधी हस्त पुस्तिका/पत्रिका आपल्याला सांगते की माणसांच्या घुसखोरीमुळे पर्यावरणाच संतुलन कस बिघडत आहे. विद्यार्थी आपल्या माहितीच्या आधारे पाठ्य सामग्रीमधून जे काही शिकत आहेत ते समजण्यासाठी व त्यावर संवाद साधण्यासाठी आपल्या वाचण्याच्या कौशल्याचा व युक्तीचा प्रयोग करतील.

३. **जे आपण शिकलो, त्याला पुढे वाढवणे व त्यावर काम करणे:**
शिकण्याचे दिशानिर्देश व पाठाशिवाय इतर परस्पर संवादासाठी ऑनलाईल चित्र, हत्तींसाठी कार्य, हत्तीसंबंधी शिल्प व क्रियाकलाप.
विद्यार्थी जे काही शिकलेत त्याला पक्के करण्यासाठी दिलेल्या पर्यायी विचारांना गृहकार्य किंवा परियोजना कार्याच्या रुपात उपयोगात आणू शकतात.

### नियम बनवण्यासाठीचे कार्य:
विचार विनिमय करत असताना अनेक ज्वलंत विचार व भावना प्रकट होऊ शकतात. त्यामुळे अनेक शिक्षक व विद्यार्थी आपल्या वर्गात अनेक नियम सुरुवातीपासूनच बनवतात. त्यामुळे वेगवेगळ्या विचारांना सकारात्मक भावनेने ऐकण्यासाठी, त्या भावनांचा आदर राखण्यासाठी व संवेदनशीलता प्रकट करण्यासाठी प्रोत्साहन मिळू शकेल.
विद्यार्थ्यांच्या दोन दोनच्या जोड्या बनवायला सांगा. त्यानंतर त्यांना प्रश्न विचारा की माझ्यात आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी लोकांनी माझ्यासोबत कसा व्यवहार केला पाहिजे? ज्यामुळे मी त्यांच्यासोबत सहज संवाद साधू शकेन जो माझ्यासाठी फार महत्वाचा आहे.
जोड्यांना ६-६ चे गट बनवून आपापसात विचार विनिमय करायला सांगा. त्यांना अशा व्यवहारांची सूची तयार करायला सांगा ज्या व्यवहारांना सर्वजण समजतात व सर्वांची त्याला सहमती आहे या सूचीमध्ये हे व्यवहार समाविष्ट असु शकतात.
अ. ते मला ऐकतील
ब. ते हसणार नाहीत
क. मी जे दूसऱ्या विद्यार्थ्यांना सांगेन त्यावर त्यांनी ओरडायच नाही.
सर्व वर्गाला एकत्र करुन प्रत्येक समुहाकडून तयार केलेली सुची बघा. एक व्यवहार एकाच वेळेला सर्व वर्ग ज्या व्यवहाराला समजत आहे आणि ज्या व्यवहाराशी ते सहमत आहेत अशा व्यवहारावर लक्ष द्या व त्याच व्यवहाराची नोंद करा. समूहाला वेगवेगळ्या व्यवहाराकडे न घेऊन न जाता स्पष्ट व्यवहाराकडे घेऊन जा. सूचीला वर्गात अशा प्रकारे प्रस्तुत करा की प्रत्येक विद्यार्थी समुह आपापले कर्तव्य अत्यंत चांगल्या पध्दतीने करण्यासाठी प्रोत्साहित होईल.

© IFAW 2011 • Front cover images: © IFAW/D. Willetts; © Tom Munro/JBG Photo

# हत्ती कधीच विसरत नाहीत:



© IFAW/J. Hrusa

## हत्ती कधीच विसरत नाहीत:

हत्ती मोठे असतात. खरंच मोठे असतात. हत्ती या पृथ्वीवरील प्राण्यांमधील सर्वात मोठा प्राणी आहे, ते फार चतुर व संवेदनशील असतात. त्यांची स्मरणशक्ती खूप चांगली असते. आपल्या नात्यातील सर्वांना फार काळापर्यंत आठवणीत ठेवू शकतात. ते आपल्या परिवाराची काळजी घेतात आणि जर आपल्या (परिवारातील) कोणाचा मृत्यू झाला तर ते उदास होताना दिसतात. हे प्राणी खूप शक्तिशाली आणि स्वस्थ असतात. परंतु आज ते पण संकटात आहेत. आज जंगलातील हत्तींचे अनेक गट आपले अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करीत आहेत.

हजारो वर्षांआधी विशाल हत्तीसारखे सस्तन प्राणी ज्यांना अमेरिकन मैस्टोडोन्स व केसांवाले विशाल हत्ती असे म्हटले जाते ते या पृथ्वीतलावर फिरत होते. परंतु आताच्या हत्तींचे हे पूर्वज या पृथ्वीवरुन नष्ट झाले आहेत.

आज हत्तींचे दोन प्रमुख समुह अस्तित्वात आहेत. आफ्रिकन व आशियाई, यांच्यामध्ये फरक करणे फार सोपे आहे. वैज्ञानिकांनी तर असा पण शोध लावला आहे की आफ्रिकी हत्तींच्या दोन प्रजाती अस्तित्वात आहेत. जंगली हत्ती आणि सवान्नाह हत्ती. सवान्नाह हत्ती जंगली हत्तीपेक्षा आकाराने मोठे असतात. त्यांचे कान आकाराने मोठे आणि दात पण खुप वळणदार असतात.

सर्व हत्ती शाकाहारी असतात. ते गवत, झाडांच्या साली, वृक्षांच्या फांद्या, पाने, फळे खातात. ते दररोज जवळ-जवळ १८ तास जेवणासाठी घालवू शकतात. एक तरुण हत्ती एका दिवसाला १८० किलो (४०० पौंड) अन्न खातो. तसेच त्याला रोज जवळ जवळ ११५ ते १९० लिटर पाणी पिण्यासाठी लागते. पाण्याच्या शोधासाठी ते अनेक किलोमीटर पर्यंत प्रवास करतात.



© IFAW/J. Hrusa



© IFAW/M. Booth

| आफ्रिकेमधील हत्ती | आशियामधील हत्ती |
|---|---|
| खांद्यापर्यंत जवळजवळ ३.१ मी.(१० फुट) लांब | खांद्यापर्यंत २.४ ते ३.१ मी. (८-१० फूट) |
| पुरुष हत्तीचे वजन जवळजवळ ६,००० किलो (१३,२०० पौंड) | पुरुष हत्तीचे वजन जवळजवळ ५,००० किलो (११,००० पौंड) |
| मोठे कान खांद्यांना झाकतात. | मोठे कान खांद्यापर्यंत पोहचत नाहीत. |
| पाठ सपाट असते, जिच्यामध्ये एक हलकासा उतार असतो. | पाठ गोलाकार असते. |
| नर आणि मादी दोघांचे दात मोठे असतात. | फक्त काही नर हत्तींचे दात असतात परंतु ते पण मोठे नाही. |
| पांढऱ्या राखाडी त्वचेवर सुरकुत्या जास्त असतात. | त्वचेवर सुरकुत्या कमी असतात, रंग राखाडीकडून पांढऱ्याकडे असतो. ज्यावर गुलाबी डाग असतात. |
| डोके सपाट असते ज्याच्यावर मध्यभागी खोलगट भाग नसतो. | डोक्यावर घुमट सारखे असते ज्याच्यावर म ध्यभागी खोलगट भाग असतो. |
| ७० वर्षापर्यंत जंगलात राहतात. | ६० वर्षापर्यंत जंगलात राहतात. |




© IFAW © IFAW/D. Willetts

३.१ ✻ तुम्ही विश्वास ठेवा किंवा ठेवू नका हे प्राणी हत्तीचे नातेवाईक आहेत.

IFAW

## त्यांचा मोठा आकार ही तर सुरुवात आहे.

हत्तींच्या शरीरामध्ये अनेक असाधारण आणि उपयोगी अंग असतात. त्यांची सोंड व दात खाण्यासाठी आपापसात संवाद साधण्यासाठी आणि इतर कामांसाठी उपयोगात आणली जातात. त्यांचे मोठे-मोठे कान आणि पाय भरपूर उपयोगी आहेत. खरे तर त्यांच्या शरीरातील जास्तीत जास्त अवयव त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठीच मदत करतात.

या आश्चर्यकारक शरीराव्यतिरिक्त हत्तींचा मेंदू पण आश्चर्यकारक आणि अनोखा असतो. एक गोष्ट महत्वाची आहे की त्यांचा मेंदू त्यांना कळपामध्ये चांगल्या पध्दतीने काम करण्यासाठी मदत करत असतो. हत्ती प्रत्येक वयाच्या हत्तींणीसोबत व छोटे हत्ती कुटुंबासोबत समुहाम ध्ये राहतात. हत्तीणी पूर्ण आयुष्यभर एकाच समुहात राहतात. नर हत्ती जास्तकरुन १२ ते १७ वर्षाचे वय झाल्यानंतर आपल्या समुहातून निघून जातात. ते एकटे किंवा छोट्या समूहात राहतात.

कोणतीही मोठी हत्तीण जिला महामाता म्हणतात ती समुहाचं नेतृत्व करते. ती सर्व हत्तींना एकत्र सुरक्षित ठेवते आणि त्यांना जेवण व अन्न गोळा करण्यासाठी मदत करते. ती महत्वपूर्ण निर्णय घेते, जसे की कधी हल्ला करायचा आहे आणि कधी संकटापासून पळून



हत्ती आपली सोंड एकमेकांच्या डोक्यावर ठेवून मैत्रीचा संकेत पण देतात.

जायचं आहे. ती दुसऱ्या हत्तीणीला छोट्या हत्तींचे पालनपोषण कसे करायचे हे पण शिकविते.

हत्तींची स्मरणशक्ती आश्चर्यकारक असते ते अनेक वर्षाआधी हरवलेल्या आपल्या कुटुंबियांना ओळखू शकतात. जेंव्हा ते भेटतात, तेंव्हा ते गोल फिरतात, आपले कान फडफडवतात आणि मोठ-मोठ्याने किंचाळतात.

हत्ती भावनाशील असतात. त्यांचे हत्तीणीसोबतचे नाते फार घनिष्ठ असते. ते शिशुच्या जन्माच्या वेळेला किंचाळून आनंद प्रकट करतात. कोणत्याही जखमी शिशुला संकटातून वाचवण्यासाठी ते त्याला एकानंतर एक घेरुन चालतात. हत्ती आपले प्रेम प्रकट करण्यासाठी आपापसात चुंबन घेतात आणि आपापली सोंड एकमेकांवर लपेटतात. ते वस्तु इकडे तिकडे फेकून खेळ पण खेळतात.

जेव्हा एखादा हत्ती मरण पावतो तेंव्हा त्याचे नातेवाईक हत्ती अनेकवेळा पान आणि गवताने त्याला गाडतात. एवढंच नाही तर मृत्यूनंतर काही वर्षांनी त्याठिकाणी जाऊन हाडांजवळ ते शोक प्रकट करतात.

### ४.१ हे खरं/अर्थपूर्ण आहे.

एक हत्ती जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याचे वजन १२० किलो (२६५ पौंड) किंवा यापेक्षाही अधिक असते. तो जास्तकरुन तरुण हत्तींपेक्षा वजनाने जास्त असतो.

एका हत्तीच्या सोंडेमध्ये हजारो मांसपेशी असतात. एका व्यक्तीच्या शरीरात ६५० पेक्षा कमी मांसपेशी असतात. हत्ती आपल्या गळ्यामध्ये बनविलेल्या एका विशिष्ठ पिशवीमध्ये पाणी साठवून ठेवू शकतात. नंतर त्यांना जेंव्हा गरम होते तेंव्हा हेच पाणी ते आपल्यावर शिंपडून घेतात. हत्तीचे शिशू आपल्या सोंडेला असे चोखतात जसे की माणसांची छोटी मुले आपला अंगठा चोखतात.





IFAW

## हत्तींची महत्वपूर्ण भूमिका

वैज्ञानिक हत्तींना आधारभूत प्रजाती मानतात. याचा अर्थ असा की पृथ्वीवरील जैवविविधता, वृक्ष व जीवजंतू यांच्या मोठ्या प्रजातींना वाचविण्यासाठी ते महत्त्वपूर्ण भूमिका वठवतात. पृथ्वीवरील पर्यावरणाची मदत हत्ती आपल्या जेवणातून करतात. याचा अर्थ असा की हत्ती जेव्हा जंगलात भोजन करतात तेव्हा त्या ठिकाणी वनस्पतींमध्ये जागा निर्माण करतात. या रिकाम्या/ मोकळ्या जागेत नवीन वृक्ष तयार होतात. त्याचप्रमाणे अन्य प्राण्यांसाठी नवीन वाटा तयार होतात. पश्चिम आफ्रिकेम ध्ये जंगली हत्तीच असे मोठे प्राणी आहेत जे मोठमोठ्या वृक्षांच्या उंच फांद्या खाऊ शकतात ते आपल्या शेणाच्या माध्यमातून या वृक्षांच्या बीया दुसऱ्या ठिकाणी पसरवतात. शेण या बियांना लागवडी योग्य बनवते आणि हे बीज नवीन वृक्षांच्या रुपात उगवते. जर या हत्तींची मदत मिळाली नसती तर यापैकी अनेक वृक्षांच्या जाती नामशेष झाल्या असत्या. सवान्नाहमध्ये राहणारे हत्ती वृक्षांची आणि झुडपांची शेंडे खातात. त्यामुळे वृक्षांची गरजेपेक्षा मोठी वाढ होत नाही आणि सुर्यप्रकाश पण त्यामुळे रोखला जात नाही. जर सवान्नाहच्या गवतापर्यंत सुर्यप्रकाश पोहोचला नसता तर ते गवत नष्ट झाले असते. त्या गवताला खाऊन जीवंत राहणारे हरिण व अन्य प्राणी नामशेष झाले असते आणि मांसाहारी प्राणी पण राहीले नसते, जे या प्राण्यांना खाऊन जीवंत राहतात. दुष्काळाच्या वेळेला सवान्नाह हत्ती पाण्याचे खड्डे खोदण्यासाठी आपल्या सोंडेचा वापर करतात. ज्यामुळे दूसऱ्या प्राण्यांना पण पाणी मिळते हे खड्डे त्या प्रदेशातील पाण्याचे स्त्रोत बनतात.



हत्ती शक्यतो एकाच रस्त्यावरुन एका पाठोपाठ एक चालून प्रवास करतात. जसे की केविपाच्या केनियाच्या सवान्नाहमध्ये सावो नॅशनल पार्कमध्ये या समूहाने बनवली आहे. इंटरनेशनल फंड फॉर एनिमल वेलफेअर/जीवकल्याण आंतरराष्ट्रीय कोषाने मागील अनेक वर्षापासून या विशाल अभयारण्यातील प्राकृतिक आधिवास व जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी मदत केली आहे आणि जंगलातील अन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी जंगलातील फिरत्या सुरक्षा दलांना नविन उपकरणे दिलेली आहेत.

© IFAW/D. Willetts



हत्तींची जेवणाची सवय त्यांच्या जंगलातील जैवविविधता टिकवण्यासाठी मदत करत असते. भारतातील हत्तींना राहण्याच्या सुरक्षित ठिकाणावर एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर नेण्यासाठी इंटरनेशनल फंड फॉर एनिमल वेलफेअर व वाईल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया ने काही दिवस आधीच एक प्राचीन रस्ता दिला आहे. ज्याच्यावरुन जवळजवळ १००० हत्ती ये-जा करत असत.

© IFAW/R. Janes

### दूर-दूरपर्यंत संवाद

हत्ती गुरगुर करुन, शिट्टी वाजवून, नाकाने आवाज काढून, किंचाळून आणि अशा अनेक प्रकारे संवाद साधतात. हत्तींचे काही आवाज तर एवढे हळू असतात की माणूस त्यांना ऐकूच शकत नाही. परंतु दूसरे हत्ती ते आवाज आठ किलोमीटर (५ मैल) दूरवरुन ऐकू शकतात. आवाजाने हत्तींचे समुह एकमेकांच्या जवळ न येता आठवडाभर संवाद साधतात. हत्ती आपल्या पावलांच्या आवाजाने पण संवाद साधतात. हा आवाज जमिनीच्या माध्यमातून ३२ किलोमीटर (२० मैल) किंवा त्यापेक्षा जास्त दूरचा प्रवास करु शकतो.




## फिरण्यासाठीचा भूभाग:

आफ्रिकन हत्ती पूर्ण आफ्रिकेमध्ये फिरत होते. परंतु आता लोकांनी राहण्यासाठी व शेतीसाठी जंगलतोड करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे त्यांचा प्रदेश आता पहिल्यापेक्षा छोटा झालेला आहे.

आज आफ्रिकेमधील ३७ देशांमध्ये वेगवेगळ्या भागात हत्ती राहतात ते अभयारण्यात अशा ठिकाणी राहतात, जेथे माणसांची वस्ती कमी आहे. आशियाई हत्तीचे. प्रदेश पण आता कमी झालेले आहेत. ते आशियातील १४ देशांमधील वेगवेगळ्या भागात जंगलामध्ये, झाडाझुडूपांच्या, गवतांच्या मैदानी प्रदेशात राहतात.

कारण मोठ्या संख्येने हत्तींना बेघर केले गेले आहे. त्यामुळे नाईलाजाने त्यांना वेगवेगळ्या छोट्या-छोट्या ठिकाणी राहावे लागते. राहण्याच्या जागेमुळे माणसाच्या आणि हत्तींच्या मध्ये संघर्षाची स्थिती उत्पन्न झालेली आहे. रस्ते आणि रेल्वेरुळांमुळे हत्तींचे जुने मार्ग तुटले आहेत किंवा हे रस्ते हत्तींना नवीन शेती व गावापर्यंत पोहचवत आहेत. हत्तींच्या कळपाला अन्न आणि पाणी शोधण्यासाठी त्रास होत आहे. त्यांना दूसऱ्या हत्तींच्या कळपाला भेटण्यासाठीच्या संधी कमी होत आहेत. त्यामुळे जोड्या बनवण्यासाठी त्यांना निवडीच्या संधी सुध्दा कमी मिळत आहेत. हत्तींच्या संख्येसाठी ही काही चांगली स्थिती नाही. या समस्यांमुळे संरक्षण कामासाठी लागलेले समुह हत्तींची घरे त्यांच्या फिरण्याच्या रस्त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ते जमिनीच्या त्याभागांचे संरक्षण करत आहेत जे भाग हत्तींच्या एका कळपाला दूसऱ्या कळपासोबत जोडतात. हत्ती या रस्त्यांमुळे आपल्या राहण्याच्या क्षेत्रामध्ये सुरक्षित फिरु शकत आहेत.

## हत्ती आणि आपण:

आशिया व आफ्रिकामधील हत्ती लोकांच्या इतिहास, जीवन व संस्कृतिसाठी खुप म हत्वपूर्ण आहे. काही धर्मामध्ये ते देवासमान आहेत. कार्यक्रमांमध्ये ते सहभागी असतात. लग्न समारंभात त्यांना सहभागी केले जाते. शेकडो वर्षापासून मनुष्य हत्तींचा जड सामान उचलण्यासाठी, ये-जा करण्यासाठी वाहनाचे साधन म्हणून उपयोग करीत आहेत. त्यांना प्रशिक्षण देऊन युध्दासाठी सुध्दा त्यांचा उपयोग केला जायचा. आजकाल टूर गाईड लोकांना फिरवण्यासाठी, हिंस्र पशुपक्षींपासून दूर ठेवण्यासाठी हत्तींचा वापर करीत आहेत. आताच्या वर्षामध्ये हत्ती आणि माणूस यांच्याम ध्ये अनेक समस्या उत्पन्न झाल्या आहेत. हत्ती माणसांसोबत जागा, जेवण व पाणी यासाठी संघर्ष करीत आहेत. ते अन्नाच्या



© IFAW/R. Janes

भारत व दुसऱ्या आशियाई देशांमध्ये हत्तींचा सांभाळ करणारे म्हणजे महावत,लोकांना व सामानाला ने-आण करण्यासाठी हत्तींना शिकवत असतात. इथे हत्तींच्या अवैध शिकारींवर नजर ठेवण्यासाठी गस्ती दलाला मदत करताना दिसून येतात.

### वातावरणातील बदल

जेव्हा हवेत असणाऱ्या गॅसमुळे उष्णता जमिनीच्या जवळ असते तेव्हा वातावरणात बदल होत असतो. या कारणांमुळे काही काळानंतर जमीन गरम व्हायला लागते. वातावरणातील बदलामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. उदा. पुरस्थिती किंवा दुष्काळ (फार काळापर्यंत पाऊस न पडणे). दुष्काळाच्या वेळी लोकांसाठी आणि प्राण्यांसाठी पाण्याची कमतरता भासू शकते.

हत्तींच्या निवासस्थानांना वाचवल्यामुळे मुख्यत्वेकरून जंगलातील वातावरणाच्या बदलाचा प्रभाव कमी होऊ शकतो. जंगल अशा काही गॅसला खेचून घेतात, जे उष्णतेला जमिनीच्या जवळ ठेवतात. त्यामुळे हत्तींच्या ठिकाणांना वाचवल्यामुळे अनेक वनस्पती व वन्य प्राण्यांना तसेच माणसाला पण मदत होऊ शकते.

शोधात अनेक वेळेला गावात किंवा शेतात येतात. शेतकरी आपल्या शेताला वाचवण्यासाठी अनेक वेळेला हत्तींना मारुन टाकतात किंवा जखमी करतात. या संघर्षात अनेक वेळेला हत्ती पण माणसाला मारुन टाकतो.

अनेक वेळेला हत्तींची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी त्यांना मारले जाते ते कधी एका हत्तीला तर कधी पूर्ण परिवाराला मारुन टाकतात हे कार्य त्या हत्तींना फार त्रासदायक असते, जे आपल्या जवळच्या हत्तींना असे मारलेले बघतात. अनेक वेळेला ते फार उदास होतात, दुसऱ्या हत्तींपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात नाहीतर फार आक्रमक होतात.

आफ्रिका देशातील काही संरक्षित क्षेत्रांना अभयारण्यात परिवर्तीत करण्यात आले आहे, जिथे हत्ती आणि माणसांमध्ये संघर्ष होत नाही. अशा प्रकारच्या प्रयत्नांनी माणूस आणि हत्ती यांच्या संघर्षाला रोखण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

## वाचवण्यासाठी

आसाममध्ये इंटरनॅशनल फंड फॉर ॲनिमल वेलफेअर व वाइल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडियाचे एक बचाव व पुनर्वसन केंद्र आशियाई हत्तींच्या जखमी व अनाथ पिलांची तोपर्यंत मदत करतात, जोपर्यंत ते मोठे होऊन स्वत:ला सांभाळू शकत नाही. जर कोणी शिशू हत्ती संकटात सापडलेले आढळले तर बचाव केंद्र सर्वात आधी त्याला त्याच्या कळपापर्यंत पोहचवण्यासाठी मदत करतात. जर ते शक्य नसेल तर एक किंवा दोन वर्ष केंद्रावरच त्यांची देखरेख केली जाते. त्यानंतर त्यांना सुरक्षित वन्यजीवन अभयारण्यात सोडले जाते. जानेवारी २०११ पर्यंत हत्तींची १३ पिल्ले जंगलात परत सोडली गेली आहेत.


© IFAW/R. Janes

## एक मोठं पाऊल:

आफ्रिकेमधील मालावी येथे इंटरनॅशनल फंड फॉर ॲनिमल वेलफेअरने म नुष्यांसोबत संघर्ष होऊ नये यासाठी ८३ हत्तींच्या एका समुहाला सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत केले. हत्ती आता देशाच्या दुसऱ्या भागात सुरक्षित वन्यजीवन अभयारण्यात स्वतंत्र जीवन जगत आहेत. इंटरनॅशनल फंड फॉर ॲनिमल वेलफेयरच्या या प्रोजेक्ट/कार्यक्रमाने दाखवून दिले की मनुष्य आणि हत्तींच्या मधील तणाव हिंसा केल्यानेच पूर्ण होऊ शकत नाही.


© IFAW

चीनच्या शेवटीच्या वर्षी वनात/रेन फॉरेस्ट शीशु आंगवाहनाहमध्ये ३०० पेक्षा कमी हत्ती आहेत. चीनचे शेवटचे हत्ती; माणसांच्या कार्यकलापामुळे येथील हत्तींना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. २००३ मध्ये आईएफएएडब्ल्यू ने लोकांना कमविण्याच्या नवीन पध्दती शोधण्यासाठी मदत सुरु केली, ज्यामुळे ते हत्तींच्या भूभागात जाऊन शेती करणार नाहीत. आईएफएडब्ल्यूने हत्तींच्या संरक्षणासाठी लोकांना सुशिक्षित करण्यासाठी देखील मदत केली आहे.


© IFAW/L. Aidong

IFAW



## हत्तींसोबत अडचणी

एक वेळ अशी होती जेव्हा आशिया आणि आफ्रिका खंडामध्ये लाखो जंगली हत्ती फिरत होते. परंतु वैज्ञानिकांचा असा निष्कर्ष आहे की, आज हत्तींची संख्या १०० वर्षांआधी जेवढी होती त्याच्या अर्धी राहिली आहे. याचे एक मुख्य कारण आहे हस्तीदंताच्या लालसेसाठी हत्तींची शिकार, हस्तीदंताचा उपयोग मनुष्य हजारो वर्षांपासून करत आलेला आहे. पियानोच्या चाबी, चॉपस्टिक्स, सुशोभिकरणाच्या वस्तु व दागदागिने हस्तीदंतापासून बनवल्या जातात. परंतु हस्तीदंत फक्त मरण पावलेल्या हत्तींपासूनच मिळू शकतात.

वेगवेगळ्या शासनांनी १९८९ मध्ये केलेल्या करारानुसार हस्तीदंत विकणे व खरेदी करणे यावर बंदी घातली आहे. तरीसुध्दा हत्तींची अवैध शिकार केली जात आहे. कारण अनेक लोक आजपण हस्तीदंतापासून तयार केलेल्या वस्तू विकत घेण्याची इच्छा व्यक्त करत आहे. हत्तींसाठी राहण्याची आरक्षित ठिकाणे सुध्दा फार कमी आहेत. या व्यतिरिक्त अनेक गरीब देशांमध्ये कायदा लागू करणे सुध्दा कठिण आहे.

पर्यावरण संरक्षण संघटन हत्तींना अवैध शिकारीपासून वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ते हस्तीदंताच्या व्यापारावर बंदी लागू करण्यासाठी मदत करीत आहेत. त्याचबरोबर ते लोकांना हे सांगण्यासाठी आणि शिकवण्यासाठी मदत करत आहे की हस्तीदंतापासून बनवलेली कोणतीही वस्तु खरेदी करु नका.

या व्यतिरिक्त वैज्ञानिक हत्तींच्या अवैध शिकारीला बंद करण्यासाठी नविन स्वरुपात प्रयत्न करत आहेत. आता ते हस्तीदंताची तपासणी करुन सांगू शकतात की ज्या मेलेल्या हत्तीचे हे दात आहेत ते कोणत्या जिवंत हत्तीचे नातेवाईक आहेत. यामुळे अशी माहिती कळते की हस्तीदंत कोठून आले आहे आणि कोणत्या ठिकाणावरचे हत्ती मारले गेले आहेत. यामुळे कायदा लागू करणाऱ्या अन्य अधिकाऱ्यांना व हत्तींना वाचवण्यासाठी काम करणाऱ्या अन्य लोकांना हे समजण्यासाठी मदत होते की कोणत्या क्षेत्रात हत्तींची अवैध शिकार केली जात आहे.

### हस्तीदंत आणि कायदा

नामशेष होणाऱ्या प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील संमेलन (आयटीईएस्) मध्ये १९८९ ला एक सनधी झाली होती, ज्याम ध्ये सर्व जंगली हत्तींना मोठ्या स्वरुपात संरक्षण दिले गेले आहे. यामध्ये आशियाई आणि आफ्रिकी हत्तींचे दात व अन्य शारीरिक अवयव विकण्यावर बंदी घातली आहे. परंतु सनधी झालेल्या एका बदलामुळे हस्तीदंतांच्या भंडाराला विकण्यासाठी अनेक वेळेला परवानगी दिली गेली आहे. विक्रेत्यांचे असे मत आहे की हे हस्तीदंत अशा हत्तींचे आहेत ज्यांचा मृत्यू नैसर्गिक पध्दतीने झाला आहे. परंतु अनेक लोकांचे असे मत आहे की हे हत्ती मारले गेले आहेत.

पर्यावरण संरक्षणकर्त्यांचे असे मत आहे की जर हस्तीदंत विक्री वैध असेल तर


© IFAW/R. Sobol

अवैध पध्दतीने शिकार करणाऱ्यांना अवैध पध्दतीने हतस्तीदंताची तस्करी व त्याला विकण्याची संधी मिळून जाईल. लोकांना हे सांगणे फार कठिण असते की कोणता हस्तीदंत वैध आहे आणि कोणता अवैध. जगभरातील अनेक लोक मानतात की जर आशियाई आणि आफ्रिकी हत्तींना वाचवायचे असेल तर हस्तीदंताच्या व्यापाराला पूर्णपणे बंद केले पाहिजे.

### इंटरनेटच्या माध्यमातून व्यवसाय

वन्यजीव आणि वन्यजीवन संबंधीत उत्पादनांच्या अवैध व्यवसायासाठी इंटरनेट एक सोपे माध्यम बनले आहे इंटरनॅशनल फंड फॉर ॲनिमल वेलफेयरला असे कळले आहे की ११ देशांमध्ये इंटरनेटवर वन्यजीवनसंबंधी जे उत्पादन विकत घेतले गेले त्यामध्ये जवळजवळ तीन चतुर्थांश शुध्द हस्तिदंताचे उत्पादन होते त्यामुळे इंटरनेटची विक्री साईड ई बी ने २००९ पासून हस्तीदंतापासून उत्पादीत वस्तुंच्या विक्रीवर बंदी घातली आहे. लोकांनी जर ऑनलाईन किंवा इतर ठिकाणावरुन हस्तीदंत विकत घेतले नाही तर ते हत्तीला वाचवण्यासाठी मदत करु शकतात.




© IFAW/D. Willetts

## हत्तींना वाचवणे

जर हस्तीदंताच्या व्यवसायाची वाढ होऊ दिली आणि हत्तींची राहण्याची ठिकाणे अशीच कमी होत राहिली तर हत्तींवर फार मोठ संकट येईल. संरक्षक गट हत्तींना वाचवण्यासाठी खूप मेहनत घेत आहेत. हत्ती आणि त्यांचे नैसर्गिक आवास (निवास) वाचवण्यासाठी शासन, संगठन संस्था व समुदाय सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे.

निसर्गाच्या संरक्षणासाठी हत्ती फार आवश्यक आहेत. हत्तींना वाचवण्याचा अर्थ आहे जास्त वनस्पती जास्त वन्यप्राणी आणि जास्त नैसर्गिक वातावरणाला वाचवणे. हत्तींचे नाहीसे होणे अनेक प्रजातींसाठी संकटाचे होऊ शकते आणि हा एक समजदार आणि प्रेमळ प्राण्याचा दुःखद अंत पण आहे.

भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने आशियाई हत्तींना वाचवण्यासाठी आताच ज्ञहाथी मेरे साथीफ नावाने अभियान चालू केले आहे. वाइल्ड लाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया शुभंकर गजू च्या माध्यमातून या अभियानाला आपल्यापर्यंत पोहचवणार आहे. भारताच्या राष्ट्रीय अस्मितेला वाचवण्यासाठी तुम्ही आमच्यासोबत सहभागी व्हा.









© IFAW/C. Cullen

# शब्दार्थ

**जैवविविधता :** जैविक विविधता कोणत्याही क्षेत्रातील प्रजाती, पेशी व जिवंत समुदायातील विविधतेचे माप.

**मांसाहारी :** मांस खाणारे प्राणी.

**संरक्षण :** कोणत्याही प्रजाति किंवा नैसर्गिक संसाधनांचा सावधानी पूर्वक वापर किंवा रक्षण.

**पर्यावरण :** एखाद्या भूभागातील वृक्ष, वन्य प्राणी आणि अन्य वस्तुंमधील परस्पर संबंधातील समुदाय, जिथे वृक्ष व प्राणी असतात.

**हत्तींचे (गलियारे):** आपल्या अधिवासामध्ये फिरण्याचे हत्तींचे रस्ते.

**नष्टप्राय प्रजाती :** अशा प्रजाती ज्या पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

**नष्ट :** अशा प्रजाती ज्या या पृथ्वीवर आता अस्तित्वात नाहीत.

**शाकाहारी :** असे प्राणी जे फक्त वृक्ष व वनस्पती खातात.

**आधारभूत प्रजाती :** अशा प्रजाती ज्या नैसर्गिक वातावरणाला किंवा कार्याला प्रभावित करतात, जसे एखाद्या इमारतीच्या पायातील दगड इमारतीच्या मजबुतीला प्रभावित करत असतात.

**महामाता :** एका परिवार समुहातील महिला नेता.

**प्रवास :** जनावरांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे.

**अवैध शिकार :** प्राण्यांची गैरकानूनी पध्दतीने शिकार करुन त्यांना मारुन टाकणे.

**प्रदेश :** तो संपूर्ण भूभाग जिथे जास्त करुन एकाच प्रकारचे प्राणी राहतात.

**पुनर्वसन :** एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी स्वास्थ्य आणि चांगल्या पध्दतीने स्थायी स्वरुपात स्थिर करणे.

**सवान्नाह :** असे मोठे गवताळ प्रदेश जिथे फार वृक्ष नसतात.

**तस्करी :** वस्तूला गैरकानूनी पध्दतीने देशामध्ये किंवा देशाबाहेर घेऊन जाणे.

**प्रजाती :** प्राण्यांचा असा समूह जो एकसारखा आहे आणि जो पिलांना जन्म देतो.

**विशाल भंडार :** एका ठिकाणी ठेवलेले खूप मोठे सामान.





# पाठ १: माहिती वाढवणे - व्हीडीओ आणि पाठ्यसामग्री

शिकण्याचे परिणाम : विद्यार्थी आपल्या पहिल्या माहितीला आठवतील. ते हत्तींशी संबंधित व्हीडिओ बघून अथवा पाठ्यसामग्री वाचून स्वत:ला त्यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न करतील, हत्तींशी संबंधित आवश्यक शब्दावली व माहितीला समजून घेतील.

बघणे/वाचणे : लहान विद्यार्थी :

सुरुवातीस/किंवा व्हिडीओ बघतांना:

१. विद्यार्थ्यांना जोडीने बसवून हत्तींच्या संदर्भात त्यांना जी माहिती आहे. त्यावर बोलायला सांगा. त्यानंतर प्रत्येक जोडीला आपली माहिती समुहाला सांगण्यासाठी सांगा. त्याचबरोबर तुम्ही त्या माहितीला माहिती तक्त्यातील कॉलममध्ये लिहा.

| माहिती | उत्सुकता | काय शिकलात |
|---|---|---|
| | | |

२. जोडीला विचारा की हत्तींबद्दल त्यांच्या मनात काय उत्सुकता आहे? प्रत्येक जोडीला सांगा की कमीत कमी एका प्रश्नाचा जरुर विचार करा आणि त्याला स्टीकी नोट (चिकटू शकणाऱ्या) कागदावर लिहा. प्रत्येक जोडीला आपला मुद्दा उत्सुकता असलेल्या कॉलममध्ये चिकटवायला सांगा ज्यामुळे वर्गातील इतर मुलांना पण तो मुद्दा माहित होईल.

३. व्हिडीओ दाखवा.

✻ व्हिडीओ दाखवल्यानंतर

४. आपल्या विद्यार्थ्यांना एकटे किंवा समूहामध्ये बसवून व्हिडीओ क्विज (प्रश्नोत्तरी खेळ) खेळवा. जेव्हा खेळ संपेल तेंव्हा अशा विषयावर चर्चा करा की ते हत्तींबद्दल काय शिकलेत? चर्चेला प्रोत्साहित करण्यासाठी खालील प्रश्नांचा उपयोग करा.

- हत्ती आपल्या सोंडेचा उपयोग कसा करतात?
- हत्ती आपापसात संवाद कसा साधतात?
- हत्ती कशा प्रकारे मनुष्यांसारखे असतात?
- हत्ती दूसऱ्या प्राण्यांसाठी कसे सहाय्यक ठरतात?
- माणसे हत्तींची मदत कशी करतात आणि त्यांच्यासाठी संकट कसे बनतात.

५. विद्यार्थ्यांना विचारा की चार्टवरील (तक्त्यावरील) कोणत्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले आहे. या चिकटणाऱ्या नोटला उतरवा व विद्यार्थ्यांना विचारुन ते काय शिकले हे चार्टवर लिहा.

✻ पाठ्यसामग्री वाचण्याच्या आधी किंवा मध्ये:

६. विद्यार्थ्यांसोबत पाठ्यसामग्री, चित्र आणि शब्दावली बघा, काही शब्दांच्या किंवा सर्व शब्दांच्या अर्थावर चर्चा करा.

७. पाठ्यसामग्री मोठ्याने वाचा किंवा कोणत्याही विद्यार्थ्याला वाचायला सांगा. वैकल्पिक स्त्रोत किंवा गृहपाठ म्हणून कार्यतक्ता १ द्या.

✻ पाठ्यसामग्री वाचल्यानंतर

८. लिहिलेल्या माहितीवर चर्चा करण्यासाठी वर दिलेल्या प्रश्नांचा उपयोग करा.

९. विद्यार्थ्यांसोबत तक्त्यावरील प्रश्नांची समीक्षा करा आणि बघा की प्रश्नाची उत्तरे दिली गेली आहेत की नाही. जर कोणत्या प्रश्नाचे उत्तर दिले नसेल तर विद्यार्थ्यांची मदत करा. त्याला इंटरनेट किंवा लिखित सामग्रीच्या मदतीसाठी प्रेरीत करा.

✻ बघणे/ वाचणे : (मोठ्या इयत्तेतील विद्यार्थी)

आधी किंवा व्हिडीओ पाहात असताना

१) विद्यार्थ्यांना जोडी ने बसवून चर्चा करायला सांगा की त्यांना हत्तींबद्दल काय माहिती आहे.

२) व्हिडीओ दाखवा.

३) जोडीने किंवा एकटे-एकटे व्हिडीओ प्रश्नमंजुषा खेळवा.

४) प्रत्येक विद्यार्थ्याला कार्यतक्ता १ ची प्रत द्या. शब्दावली वाचा व सांगा की हत्ती कोणत्या समस्यांचा सामना करतात. हत्तींना सम जण्यासाठी हे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सांगा की ते हत्तींशी संबंधित शब्दावलीबद्दल काय विचार करतात ते दुसऱ्या भागात लिहा. (संदर्भासाठी आपण शब्दकोष सुध्दा देऊ शकतो.)

✻ व्हिडीओ बघितल्यानंतर

५) विद्यार्थ्यांना व्हिडीओ प्रश्नमंजुषेची आपली उत्तरे आणि कार्यतक्ता १ च्या दुसऱ्या भागात जे लिहिलेले आहे त्यावर विचार विनिमय करायला सांगा. त्यांना जी माहिती महत्त्वाची वाटते तिला कार्यतक्त्यावर लिहायला सांगा. जर महत्वाची असेल तर कार्यतक्त्याच्या पाठीमागेसुद्धा लिहू शकतात.

६) समूहामध्ये व्हिडीओ, प्रश्न मंजुषेची उत्तरे, व कार्यतक्ता १ वर चर्चा करा. विद्यार्थ्यांना विचारा की त्यांना व्हिडीओमधील सर्वात महत्त्वाचे घटक कोणते वाटतात. त्यांना वर्गातील चार्ट पेपरवर ते घटक संक्षेपामध्ये लिहायला सांगा.

✻ पाठ्यसामग्री वाचण्याआधी किंवा वाचताना

७) विद्यार्थ्यांसोबत पाठ्यसामग्री, चित्र व शब्दावली बघा/ पूर्णावलोकन करा.

८) विद्यार्थ्यांना पाठ्यसामग्री एकटे किंवा आपल्या मित्रांसोबत वाचायला द्या. जो चांगले वाचन करतो अशा सोबत असा विद्यार्थी जोडा ज्याला वाचायला अडचणी येतात.

✻ पाठ्यसामग्री वाचल्यानंतर

९) वाचल्यानंतर विद्यार्थ्याच्या माहितीला एकत्र करण्यासाठी मदत म्हणून पुढील प्रश्नांचा वापर करा.

हत्ती आपल्या सोंडेचा वापर कसा करतो?

हत्ती कशा प्रकारे सामाजिक जीव आहेत?

हत्ती कशा प्रकारे जैवविविधता टिकविण्यासाठी मदत करतात?

हत्तींचे दात कशा प्रकारे त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मदत करतात व त्यांच्यासाठी धोका उत्पन्न करतात?

लोक कशा प्रकारे हत्तींची मदत करतात व कशा प्रकारे त्यांना त्रास देतात?

विद्यार्थ्यांनी पाठ्यसामग्रीमधून मिळवलेली माहिती आपल्या कार्यतक्त्यामध्ये दिली आहे का? व चार्टवर लिहिण्यासाठी आपली मदत केली आहे का?

✻ आपला काय विचार आहे?

परस्पर प्रभाव टाकणारी संवादात्मक पध्दती, आपला काय विचार आहे? च्या माध्यमातून विषयाला समजून घेऊन व्हिडीओ दाखवण्याआधी किंवा नंतर पाठ्यसामग्री वाचून आपण शिकण्याची प्रक्रिया चालू ठेवू शकतो.

त्यांना स्वत: करु द्या : रंगीत चित्र, निबंध, लघुकथा, कविता व अन्य रचनात्मक कार्याच्या माध्यमातून आपल्या विद्यार्थ्यांना कल्पना करण्यासाठी व शोध घेण्यासाठी प्रेरित करा. विषय असेल - 'हत्तींशिवाय जमिनीवर एक दिवस.' विद्यार्थ्यांच्या चांगल्या रचनांना ॲनिमल

IFAW

# कार्यतक्ता १ : बघण्या/वाचण्यासाठी तक्ता.

नांव ---------------------------------------------------------------- दिनांक ------------------------------

| शब्द | शब्द हत्तींशी कसे संबंधित आहेत? | मी काय माहिती मिळविली? |
|---|---|---|
| दात | | |
| सोंड | | |
| संवाद | | |
| महामाता | | |
| अवैध शिकार | | |
| जैवविविधता | | |
| आधारभूत प्रजाती | | |

**सबसे महत्वपूर्ण तथ्य**

हत्ती कधीच विसरत नाही.

## व्हिडीओ प्रश्नमंजुषा

नांव : ------------------------------------------ दिनांक ------------------------

आता आपण जी ध्वनिचित्रफित बघितली
त्यातून आपण काय शिकलो? खाली
विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.



१. यांच्यापैकी कोण आजच्या हत्तींशी संबंधित नाही.
   अ) डुक्कर
   ब) मानेती
   क) केसवाले विशाल हत्ती

२. आफ्रिकेत सवान्नाहमध्ये कोणत्या अनुकुलतेमुळे हत्तींना थंड राहण्यासाठी मदत मिळते.
   अ) गादीदार पाय
   ब) मोठे कान
   क) लांब दात

३. हत्तींचे बाहेर निघालेले लांब दात खरे तर खाण्याचेच दात आहेत.
   अ) बरोबर
   ब) चूक

४. एक आफ्रिकी नर हत्तीचे वजन किती असू शकते?
   अ) एका छोट्या पिलाच्या वजनाएवढे
   ब) ६ पिलांच्या वजनाएवढे
   क) ८० व्यक्तिंच्या वजनाएवढे

५. खाली दिलेल्या कामांपैकी कोणते काम हत्ती फक्त आपल्या सोंडेने करु शकत नाही?
   अ) झाडाची एक फांदी उचलणे.
   ब) गवताचे एक पाते उचलणे.
   क) पाणी पीणे.

६. खाली दिलेल्या प्रकारांपैकी कोणता प्रकार असा आहे ज्यामुळे हत्तींच्या नैसर्गिक निवासस्थानाला मदत मिळते?
   अ) हत्ती मोठ्या प्रमाणात मिथेन गॅस बनवतात ज्यामुळे हवा शुध्द राहते.
   ब) हत्ती मोठ्या संख्येने शेण टाकत असतात ज्यामुळे रोपांना पसरण्यासाठी मदत होते.
   क) हत्ती मोठी कंपन करतात ज्यामुळे वृक्ष पडतात आणि गवत पसरण्यासाठी मदत होते.

७. कोणत्या गोष्टींमुळे कळते की, हत्ती मनुष्यांच्या जवळ राहीले तर संघर्ष वाढतात?
   अ) जेव्हा हत्तींना उष्णता जाणवायला लागते तेव्हा ते लोकांना पळवतात. शेतीचे नुकसान करतात व गावांना उध्वस्त करतात.
   ब) जेव्हा हत्तींना जेवणासाठी अन्न राहत नाही तेव्हा ते अशा प्राण्यांना खातात ज्या प्राण्यांना खाण्यासाठी माणसाने शिकार करुन आणले आहे.
   क) जेव्हा हत्तींना राहण्यासाठी जागा राहत नाही तेव्हा ते माणसांच्या वस्तीकडे येतात ज्यामुळे हत्ती व माणूस दोघांनाही त्रास होतो.

८. ते तीन कारणे कोणती आहेत ज्यामुळे हत्ती इतिहासात माणसांसाठी महत्वपूर्ण राहिले आहेत?

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

९. आज हत्तींना कोणते तीन धोके आहेत.

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

१०. 'आपण हत्तींना न विसरणे, हे महत्वाचे आहे' लेखकाने असे का लिहिले?

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

उत्तर : १) अ २) ब ३) अ ४) क ५) क ६) ब ७) क ८) उत्तरामध्ये असू शकते : प्रवासासाठी, जड वस्तू उचलण्यासाठी युध्द व धर्म. ९) उत्तरामध्ये असू शकते: रस्ते व लोहमार्ग बनवणे, ज्यामुळे प्रवास मार्ग नष्ट झाले, नैसर्गिक भूभाग नष्ट होणे, हस्ती दंतासाठी अवैध शिकार, हवापाणी बदलाचा प्रभाव, भूभागासाठी हत्ती व माणसांमध्ये संघर्ष. १०) हा तुमचा निर्णय आहे.



# पाठ-२ : नैसर्गिक अधिवासाबद्दल समजणे अनुकरण व संवाद पध्दती/अभिनय

शिकण्याचे उद्देश :

गतिविधीमध्ये भाग घेऊन विद्यार्थ्यांनी नैसर्गिक अधिवास नष्ट होण्याची व विखंडनाची स्थिती समजून घेतील व लोकांना सांगण्यासाठी लिहिण्या-बोलण्याच्या आपल्या कौशल्याचा प्रयोग करतील.

✻ पाठ्यसामग्रीबद्दल सांगणे (प्रत्येक वयाचे विद्यार्थी)

१. पाठ्यसामग्रीमधील 'त्यांचा मोठा आकार ही तर सुरुवात आहे' 'फिरण्यासाठीचा भूभाग' 'वातावरणातील बदल' हे भाग मोठ्याने वाचा.

२. खाली दिलेले प्रश्न फळ्यावर लिहा. विद्यार्थी यावर समुहात चर्चा करतील. त्याआधी त्यांना सांगा की, आपल्यासोबत बसलेल्या मित्रासोबत प्रत्येक प्रश्नावर चर्चा करा. त्यांना हे सांगा की प्रत्येक उत्तर पाठ्यसामग्रीमधून कसे शोधायचे आणि कशा प्रकारे सामग्रीमधून संकेत घेऊन परिणाम काढायचे आहे.

हत्तींचे नैसर्गिक निवासस्थान नष्ट होणे व विखंडनाची कोणती कारणे पाठ्यसामग्रीमध्ये दिली गेली आहेत? (शेती, वस्ती, वातावरणातील बदल, रस्ते व लोहमार्ग बनल्यामुळे अडचणी)

नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे हत्तींना कोणत्या संकटांना सामोरे जावे लागते? (अन्न व पाण्यापर्यंत पोहोचणे आधी सारखे राहिले नाही. माणसांसोबत संघर्ष वाढत आहेत. समुह वेगवेगळी होतात. जोड्या बनवण्याच्या संधी कमी होतात. रोगराई वाढायला लागते.)

हत्तींच्या नैसर्गिक अधिवासाच्या मुद्यांवर मदतीसाठी मनुष्य काय करु शकतो? हत्तींना फिरण्यासाठी रस्ते बनवणे, नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण, कागदाचा कमी वापर, ज्यामुळे जंगलांची तोड होणार नाही, उर्जेचा कमी वापर ज्यामुळे वातावरणात कमी बदल होतील. पुढाऱ्यांना लिहिणे व इतरांना माहिती देणे.




३. विद्यार्थ्यांना आपल्या सोबत घेऊन तक्त्यावर एक आकृती बनवायला सांगा. त्यामध्ये निवासस्थान नष्ट होण्याची सूची बनवायला सांगा. तुम्ही बनवलेला तक्ता कसा दिसेल हे समजण्यासाठी इथे दिलेली आकृती बघा.

## निवासस्थान नष्ट होण्याच्या परिणामाचे अनुकरण

१. फळ्यावर ही स्थिती लिहा: एका स्थानिक गावातील घरांची संख्या व त्यांच्या आजुबाजूला शेती वाढली आहे. याचा अर्थ असा की हत्तीच्या अधिवासाचा २५% हिस्सा नष्ट झाला आहे. हत्तींवर याचा काय प्रभाव पडेल?

२. विद्यार्थ्यांना आपल्या वर्गाचा आकार मोजायला सांगा व त्याला ते फळ्यावर लिहायला सांगा. विद्यार्थ्यांना हिशोब लावू द्या की यापैकी २५% भाग नष्ट झाला तर किती भाग राहणार, याची नोंद करा.

३. विद्यार्थ्यांना सांगा की वर्गाच्या पूर्ण आकाराचे ५०% व २५% अधिवास द्वीप बनवा. वर्गातील फरशीवर दोरी किंवा दोऱ्याने खूणा करायला त्यांची मदत करा.

४. वर्गातील ७५% विद्यार्थ्यांना मोठ्या जागेवर व २५% विद्यार्थ्यांना छोट्या जागेवर बसवा. अशा अवस्थेत वर्गातील दैनंदिन काम चालू ठेवा. त्यांना सांगा की, दोन्ही गट एकमेकांसोबत बोलू शकत नाही.

५. विद्यार्थ्यांसोबत चर्चा करा की कशा प्रकारे एकमेकांसोबत बोलू न शकल्याने आणि २५% जागा कमी होण्याने ते प्रभावित आहेत. एक दुसऱ्यांच्या एवढ्या जवळ बसून त्यांना कसे वाटत आहे? छोटी-छोटी कामे करण्यासाठी त्यांना अडचणी येत नाहीत का? हत्तींना आपले २५% अधिवास सोडावे लागल्यामुळे त्यांना कसे वाटत असेल? ते काय करत असतील?

खूण करुन त्यांचे रस्ते तयार करा ज्यावरुन चालत जाऊन ते आपली पुस्तके, जेवणाचा डबा व पाणी घेण्यासाठी जातील. त्यानंतर या रस्त्यांना बंद करा. अशा अवस्थेत विद्यार्थ्यांना आपली दैनंदिन कामे करायला सांगा. आता हत्तींसोबत तुलना करा की पाणी घेण्याच्या व दैनंदिन ये जा करण्याच्या रस्त्यांना बंद केल्यामुळे त्यांना कसे वाटत आहे.

## नैसर्गिक अधिवास नष्ट होणे- अभिनयः

१. फ्लैश कार्डवर हे शब्द लिहा : आई, मुलगा, अन्न, पाणी, प्रवास, तब्बेत,शत्रु व संवाद करणे.

२. दोन-दोनच्या जोड्या बनवून मुलांना सांगा की समजा तुम्ही हत्ती आहात/ प्रत्येक जोडीला एक कार्ड उचलायला सांगा. त्यांना सांगा की स्वत:ला हत्ती समजून कार्डवर लिहिलेल्या शब्दावर अशा प्रकारे चर्चा करा की त्यापैकी एक हत्ती एक मोठ्या आणि मोकळ्या जागेवर राहत आहे जिथे दूर दूरपर्यंत मनुष्य वस्ती नाही आणि दुसरा हत्ती एका गावाच्या जवळ राहत आहे आणि ज्याचे क्षेत्र हत्तींच्या अधिवासापर्यंत येऊन पोहचले आहे.

३. छोट्या आणि कमी वाढ झालेल्या पिल्लांसाठी तुम्हाला उदाहरण द्यावे लागेल. सांगा की मी पाणी असलेले कार्ड उचलले आहे. पहिला:
मी असा हत्ती आहे जो एक मोठ्या आणि मोकळ्या जागेवर राहत आहे. मला अनेक वेळेला पाण्याच्या शोधात दूरपर्यंत जावे लागते. दुष्काळ पडला आहे आणि मला पुरेसे पाणी मिळत नाही. दुसरा:
आता मी असा हत्ती आहे, जो लोकांच्या जवळ राहत आहे. पाणी गावाच्या दुसऱ्या टोकाला आहे. माझा समुह गावाला तुडवून दुसऱ्या बाजूला जात आहे. लोक नाराज होऊन माझ्या समुहातील काही हत्तींना मारुन टाकत आहेत.

४. जेव्हा मुले दोन्ही बाजूंच्या हत्तीच्या दृष्टीकोनातून शब्दांमध्ये चर्चा करतील तेव्हा त्यांना दोन्ही प्रकारच्या हात्तीच्या विचारावर आपापसात संवाद साधु द्या.



# पाठ-३ : हत्ती व पर्यावरणाचा संबंध

शिकण्याचा उद्देश:
विद्यार्थी आपल्या पर्यावरणात हत्ती, त्यांचे वनस्पती व अन्य जीवजंतुसोबतचे संबंध व जैवविविधता बनवून ठेवण्यासाठी त्यांची भूमिका समजून घेतली.

## पर्यावरणाचा संबंध (छोट्या वयातील विद्यार्थ्यांसाठी)

१. पाठ्यसामग्रीमधून हत्तीची महत्वपूर्ण भूमिका असलेला भाग (यंगर रीडर एडिशनमधून) विद्यार्थ्यांना वाचून दाखवा ज्यामुळे ते तुमच्या पाठीमागून मोठ्याने बोलतील.

२. आपल्या पर्यावरणामध्ये हत्तींची काय भूमिका आहे, हे समजण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करा. पाठ्यसामग्रीमध्ये सांगितलेली जैवविवितधतेची अवधारणा आणि आधारभूत प्रजाती इत्यादी विद्यार्थ्यांना समजण्यासाठी कठीण जातील. त्यामुळे हत्तींची कामे (या वाक्याला फळ्यावर लिहा) यातुनच त्यांना समजावून सांगा. पाठ्यसामग्रीच्या खाली दिलेल्या अशा वाक्यांना घेऊन विद्यार्थ्यांना जोड्यामध्ये बसवून त्यावर चर्चा करायला सांगा व फळ्यावर त्याचे चित्र काढा. हत्ती जेव्हा जंगलामध्ये जेवतो तेव्हा वनस्पतीमध्ये खाली जागा निर्माण होते. त्यामुळे नविन गवत उगवायला मदत मिळते व इतर प्राण्यांना नवीन रस्ते मिळत असतात.
आपल्या शेणाच्या माध्यमातून ते या वृक्षांच्या बिया सर्व ठिकाणी पोहचवतात. शेण या बियांना उगण्यासाठी मदत करते. त्यामुळे ते नवीन वृक्षांच्या माध्यमातून विकसित होतात.
दुष्काळाच्या वेळेला सवान्नाहमधील हत्ती आपल्या सोंडेने खड्डे खणून पाणी काढतात. त्यामुळे दुसऱ्या प्राण्यांनासुध्दा पिण्यासाठी पाणी मिळते.
विद्यार्थ्यांच्या जोड्यांना आपली चित्रे सर्वांना दाखवायला सांगा. गरज असेल तर त्यावर चर्चा करा. त्यानंतर पाठ्यसामग्रीमधून जास्त कठीण कारण व प्रभावच्या क्रमाला पुढे सरकवा ज्यामध्ये सवान्नाह हत्तीचे वृक्षांना व झाडाझुडपांना खाणे, यामुळे गवत वाढण्यासाठी मदत होणे. गवत खाणाऱ्या प्राण्यांना गवत मिळणे व त्या शाकाहारी प्राण्यांना खाणाऱ्या मांसभक्षी प्राण्यांना मदत मिळणे हे समाविष्ट असेल. समुहामध्ये या संबंधाच्या क्रमाला फळ्यावर बनवून दाखवा. नंतर ङ्कारण व प्रभावफ या साखळीला एका जाळ्याच्या रुपात विस्तारीत करा. ज्यामध्ये गवत वाढण्याचे अन्य प्रभाव गवत खाणाऱ्या प्राण्यांची उपस्थिती इ. गोष्टी असतील.

## पर्यावरणाचा संबंध (छोट्या वयाच्या विद्यार्थ्यांसाठी)

१. विद्यार्थ्यांना हत्तींची महत्त्वपूर्ण भूमिका पुन्हा वाचायला द्या (ॲडव्हान्स रीडर एडीशन)

२. खाली दिलेले प्रश्न बोर्डवर लिहा.(विद्यार्थ्यांना यावर जोड्यांनी चर्चा करु द्या)

- जैवविविधता काय आहे? (जैविक विविधता- प्रजाती, पेशी व पर्यावरणात राहणारे अन्य समुदाय).
- जंगली हत्ती आपल्या नैसर्गिक अधिवासामध्ये, जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी कशी मदत करतात, वृक्ष आणि झाडी यामध्ये कसे अंतर, निर्माण करतात. ज्यामुळे नविन गवत उगवण्यासाठी मदत होते. शेणाच्या माध्यमातून बीया पसरवतात जे उगवून वाढायला लागतात?
- सवान्नाह हत्ती झेब्रा आणि हरिण इ. गवत खाणाऱ्या प्राण्यांना कसे प्रभावित करतात? ते सिंहासारख्या हिंस्त्र प्राण्याला कसे प्रभावित करतात? चिमणी व चिटपाखरांसारख्या छोट्या प्राण्यांना कसे प्रभावित करतात? (गवताच्या त्या मैदानांना वाचवून जिथे प्राणी चरतात आणि सिंहासारख्या प्राण्यांचे भक्ष बनतात. पाण्याचे खड्डे खोदतात व दुसऱ्या प्राण्यांसाठी पाणी उपलब्ध करुन देतात.
- जर हत्ती राहिलेच नाही तर जंगल व सवान्नाहमध्ये बाकी राहिलेल्या प्राण्यांचे काय होईल? (पर्यावरणात बदल होईल. ज्या प्रजाती या पर्यावरण तंत्रावर अवलंबून आहेत त्या नष्ट होऊन जातील.)

३. प्रत्येक समूहाला मोठ्या तक्त्यावर पर्यावरण तंत्राचा कसा संबंध आहे याचा नकाशा काढू द्या ज्यामुळे संबंध आणि संपर्काचे एक जाळे बनलेले असेल. ज्यामध्ये हत्ती एका बाजूला व दुसरे प्राणी जे हात्तींच्यासोबत त्यांच्या ठिकाणांवर राहतात (जसे की वर सवान्नाहमधील प्राण्यांच वर्णन केले आहे) दुसऱ्या बाजूला दाखवलेली असेल. तुम्ही विद्यार्थ्यांच्या गटाकडून एक किंवा अन्य प्राण्यांची माहिती इंटरनेट किंवा अन्य माध्यमातून घ्यायला सांगू शकता.

४. एका वेळेला जेव्हा नकाशे तयार होतील तेव्हा सर्व गटांना एकत्र बोलवून चर्चा करायला सांगा व आपआपले नकाशे सर्वांना दाखवायला सांगा.

## प्राण्यांचे वर्गीकरण व संबंध:

वर्गामध्ये विचारविनिमय करुन त्या प्राण्यांची व किड्या मुंग्यांची सूची बनवा जे प्राणी सवान्नाहमध्ये हत्तींसोबत राहतात त्यापैकी काहींची नावे आहेत - हरिण, मुंगी, चित्ता, चिंकारा, कोल्हा, मिरकैट-मुंगुसासारखा प्राणी, शिकारी चिमणी, गेंडा, गिधाड इ.
विद्यार्थ्यांना सुचीमधील प्राण्यांची विभागणी करायला सांगा. उदाहरणाच्या रुपात आपण पर्यावरणीय भूमिकेसाठी (उत्पादक, शाकाहारी, मांसाहारी, गवत खाणारे प्राणी, मेलेले प्राणी खाणारे इ.) अथवा नैसर्गिक रुपरेशेसाठी जसे (पक्षी, किटपतंग व स्तनपायी इ.)
वैयक्तिक स्तरावर एका विद्यार्थ्याला एक प्राणी व हत्तीसोबत त्याचा संबंध यावर काम करायला सांगा. एका प्राण्यावर वेगवेगळे विद्यार्थी वेगवेगळे काम करु शकतात. जेव्हा ती वेगवेगळी माहिती आपण एकत्र करु तेव्हा एका प्राण्यावर काम केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना वर्गात सर्वांसमोर बोलण्याआधी एका गटात बसवून आपापल्या माहितीवर चर्चा करायला सांगा,वर्गात गवताच्या प्रदेशात हत्तीच्या जीवनासाठी जैवविविधता कशी गरजेची आहे यावर चर्चा करा.

## बाहेर चला : पर्यावरणाच्या शोधासाठी:

वर्गात शिकल्यानंतर विद्यार्थ्यांना बाहेर घेऊन जा. ज्यामुळे विद्यार्थी जंगलातील प्राणी, जैवविविधता व पर्यावरणाचा संबंध जवळून बघू व समजू शकतील.
आईएफडब्ल्यू ची ईको इन्वेस्टिगेशन एंड कार्यतक्ता आधारभूत कार्यक्षेत्र कार्यपध्दतीवर आधारलेली आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांचा स्थानिक जैवविविधतेशी परिचय एक विशेष ठरवलेल्या ठिकाणी बघून व ओळखून केलेला असतो, जसे की शाळेतील मोकळा भाग, जवळील कोणताही बगीचा, गवताचे मैदान किंवा कोणतेही राखीव क्षेत्र.
मानवाच्या हालचाली प्राण्यांना व त्यांच्या ठिकाणांना कशा प्रभावित करतात या पाठामुळे अशा गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल.



# पाठ-४ : विवरणवर प्रतिक्रिया

शिक्षणाचा उद्देश: विद्यार्थी एका हत्तीला वाचवण्याची माहिती वाचतील व आपले विचार प्रकट करण्यासाठी वेगवेगळ्या कार्यकलापांपैकी एकाला निवडतील. विद्यार्थी पाठ्यसामग्रीला समजण्यासाठी, व्याख्या करण्यासाठी व चांगल्या पध्दतीने समजून घेण्यासाठी अनेक प्रकारच्या मार्गांचा अवलंब करतील.

✻ पाठ्यसामग्रीचा परिचय (प्रत्येक वयाच्या व क्षमतेच्या विद्यार्थ्यांसाठी).

१. विद्यार्थ्यांना कार्यतक्ता २ गुपचूप वाचायला सांगा. लहान व कमी क्षमतेच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्याने वाचा व त्यांना पाठीमागे म्हणायला सांगा.

२. विद्यार्थ्यांना माहिती पूर्ण कळली आहे की नाही हे समजण्यासाठी पुढील प्रश्न विचारा-
हत्ती शेतात होते यावरुन त्यांच्या नैसर्गिक अधिवासाबद्दल निवासस्थानाबद्दल काय समजते?
तुम्हाला माहित आहे का की शेतकरी हत्तींबद्दल काय विचार करतात?
प्रत्येक लहान हत्तीसाठी देखरेख करणारा वेगळा व्यक्ती का होता?
रखवालदार छोट्या हत्तींना एकत्र फिरायला का नेत होते?

३. पाठ्यसामग्रीमधून विद्यार्थी काय शिकलेत हे समजण्यासाठी कार्यतक्ता २ मधील कार्यकलापांपैकी एका कार्याची विद्यार्थ्यांना निवड करु द्या. कमी सक्षम विद्यार्थ्यांना असे कार्य निवडण्यासाठी मदत करा की ज्याला ते पूर्ण करु शकतील. त्यांचे कार्य पूर्ण करण्यासाठी त्यांना मदत करा किंवा त्यांना जोडीने काम करु द्या. कार्यकलापावर पुढील चर्चा खाली दिलेली आहे.

## एका हत्तीच्या नजरेतून गोष्ट पुन्हा लिहा:

हे आधी ठरवा की मुलांना माहित आहे की पाठ्यपुस्तकात जे लिहिलेले आहे ते बाहेरील व्यक्तीच्या नजरेतून लिहिलेले आहे, जे समुहात राहणारे, छोटी पिल्ले, काम करणारे इ. सर्व हत्तींच्या दृष्टीकोनाला सांगत आहे. विद्यार्थ्यांना पुन्हा लिहिण्यासाठी हत्तींच्या पिल्लांच्या नजरेतून लिहावे लागेल. त्यांना सांगा की ते प्रथमपुरुषी शैलीतून कसे लिहिणार. जर ते कोणत्या चरित्रात जाऊन गोष्ट लिहित असतील तर त्यांना गोष्ट बदलण्याचा अधिकार सुध्दा द्या.

प्रथम पुरुषाचे उदाहरण:

मी एक मोठा आवाज ऐकला आणि घाबरुन बघू लागलो की कळत आहे. मी मोठ्याने ओरडून त्यांना सांगितल की परत येऊन मला घेऊन जा इथे खड्ड्यात एकटे सोडू नका. मी वर बघितले तर एक माणूस मला खाली वाकून बघत होता. मी विचार केला की आता माझे कसे होणार?

लिहिल्यानंतर समुहामध्ये चर्चा करा की लहान हत्तीच्या नजरेतून लिहायला कसे वाटले? विद्यार्थ्यांना विचारा की यामुळे त्यांना हत्तीची स्थिती सम जण्यासाठी कशी मदत मिळाली?

## कृत्रिम वाचवण्याचा अभिनय:

विद्यार्थ्यांना गोष्ट वाचू द्या आणि त्यानंतर अशाच प्रकारच्या वाचवण्याच्या गोष्टीवर अभिनय करायला सांगा. तुम्ही वर्गातील मुलांना दोन भागात वाटून त्यांना आपल्या पध्दतीने गोष्ट तयार करायला व दूसऱ्याच्या गोष्टीची समीक्षा करायला सांगा. गोष्टीला नाट्यरुप देण्यासाठी बदल करायला त्यांना प्रेरित करा. जर त्यांना वाटत असेल तर ते कथावाचकाचे पात्र पण त्यात जोडू शकतात. जर वेळ असेल तर स्क्रिप्ट लिहिण्यासाठी किंवा लिहिलेली स्क्रिप्ट पुन्हा चांगली करण्यासाठी प्रेरित करा. छोट्या आणि कमी समज असलेल्या मुलांना स्क्रिप्ट लिहिण्यासाठी मदत करा, ज्यावर ते अभिनय करु शकतील. कार्यकलापानंतर वर्गात चर्चा करा की कशा पध्दतीने त्यांना दुरावलेल्या प्राण्यांना व प्राण्यांना वाचवणाऱ्यांच्या स्थितीची माहिती मिळविण्यासाठी मदत मिळाली. या व्यतिरिक्त एक पर्याय असा पण असु शकतो की, जेव्हा विद्यार्थी अभिनय करत नसतील तेव्हा त्यांना समीक्षक किंवा अलोचकाची भूमिका द्या त्यांना टिप्पणी लिहिण्यासाठी व नंतर छोटी-छोटी समीक्षा लिहिण्यासाठी प्रेरित करा.

## कृत्रिम मुलाखत लिहिणे :

१. ज्या मुलाखतीमध्ये छोटी मुले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, कार्यक्रमाचे आयोजन, अहवाल लेखन किंवा संवादाता बनून काम करत असतील. अशा मुलाखतीचे उदाहरण विद्यार्थ्यांना द्या किंवा त्यांना अशा मुलाखतीची आठवण करुन द्या ज्या त्यांनी बातम्यांच्या कार्यक्रमात बघितल्या असतील.

२. विद्यार्थ्यांना वाचवण्याच्या केंद्रावर रखवालदाराच्या अभिनयाबद्दल विचार करु द्या. काय प्रश्न विचारायचे हे पण ठरवू द्या. हत्तींचा एक रक्षणकर्ता त्याला सांगा की आपले प्रश्न व उत्तर रेकॉर्ड करा.

३. यानंतर विद्यार्थी आपल्या मित्रासोबत मुलाखतीचे एक नाटक तयार करतील जे नाटक वर्गात सादर केलं जाईल. याच्या जागेवर कृत्रिम ईमेल मुलाखत पण होऊ शकते. ज्यामध्ये एक विद्यार्थी मुलाखतीचे प्रश्न लिहिणार व दुसरा लिहूनच उत्तर देणार व पहिला उत्तराला स्पष्ट करण्यासाठी पुन्हा एक प्रश्न विचारणार.

४. छोट्या व कमी समज असणाऱ्या विद्यार्थ्यांना विचार करुन त्या प्रश्नांची सूची तयार करण्यासाठी मदत करा जे प्रश्न ते रक्षणकर्त्याला विचारु शकतील. प्रश्नांची यादी तयार करा. विद्यार्थ्यांना सांगा की ते प्रश्नांची उत्तरे अशा प्रकारे देतील जसे तेच रखवालदार आहेत. जर गरज पडलीच तर विद्यार्थ्यांना रखवालदाराच्या भूमिकेत उत्तर देवूनपण दाखवा.

## वृत्तपत्रासाठी एक लेख/ ब्लॉग किंवा सचित्र कादंबरी लिहा.

उदा. म्हणून विद्यार्थ्यांना वृत्तपत्राचा एक लेख किंवा ब्लॉग दाखवा जेणेकरुन ते संदर्भासाठी उपयोगात आणू शकतील. त्यांना कोण, काय, कुठे, कधी, का आणि कसे याचे उत्तर शोधण्यासाठी जोड्यांनी काम करु द्या. (छोट्या मुलांना किंवा कमी समज असलेल्या मुलांना करुन दाखवा) मुलांना एका कागदाला पाच भागात विभागणी करुन कॉलमवर प्रश्न लिहायला सांगा. प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी त्यांना छोट्या हत्तींची पाठ्यसामग्री पुन्हा बघू द्या. मग त्यांना एका विदेशी संवादाता किंवा ब्लॉगरची भूमिका करायला सांगा. त्यांना वृत्तपत्राचे लेखक किंवा ब्लॉगच्या पुर्नलेखनासाठी आपल्याच उत्तरांचा प्रयोग करु द्या.

वैयक्तिक: कार्यकलापामध्ये विविधता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना टेक्स्ट संदेशच्या रुपात वृत्त प्रस्तुत करायला सांगा किंवा इंटरनेटवर न्यूजफिडच्या माध्यमातून जी कोणत्याही बातमीला प्रकाशित करण्यासाठी केली जात असेल त्याद्वारे किंवा गोष्टीला सचित्र कादंबरीच्या रुपात प्रस्तुत करायला सांगा. कोणत्याही प्रकाराने प्रस्तुत करायला सांगा परंतु त्यांना उदाहरण देऊन समजवा व त्या शैलीची विशेषता (उदा. शब्दांची सीमा वगैरे) पण त्यांना समजावून सांगा.

# कार्यतक्ता २ : हत्तींना वाचवणे

IFAW

**नांव :** ---------------------------------------------------- **दिनांक :** --------------------------------

**सूचना : गोष्ट वाचा. प्रतिक्रिया देणारी कोणतीही क्रिया करा.**

## हत्तींना वाचवणे/मुक्त करणे:

भारतात अर्ध्या रात्री हत्तींचा एक समूह जेवणाच्या शोधात जंगलातून निघून एका शेतात पोहचला. हत्ती शेताच्या बांधावर चिखलाने भरलेल्या खड्याच्या जवळ आले तेव्हा अचानक त्यांचे एक छोटे पिल्लू सरकून त्या खड्यात पडले. त्याने हात पाय हलवून खड्याच्या कडेला/काठावर येण्याचा प्रयत्न केला.परंतु ते एवढे मजबूत किंवा मोठे नव्हते की काठावर येऊ शकेल. त्याने घाबरुन दुसऱ्या हत्तींना बोलवण्यासाठी मोठ्याने ओरडायला सुरुवात केली.

त्याची आई व इतर हत्तींनी त्याची मदत करण्याचा प्रयत्न सुरु केला पण खड्डा एवढा खोल होता की त्यांची सोंड त्या पिलापर्यंत पोहचत नव्हती. इतर हत्ती त्या पिल्लासाठी काहीच करु शकत नव्हते. पण त्याला सहानुभूती देण्यासाठी खड्ड्याच्या जवळच थांबून राहिले.

सकाळी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात हत्तींना पाहिले. त्यांना आपल्या शेतातून घाबरवून हाकलून लावण्यासाठी ते काठ्या आणि भांडी हातात घेऊन मोठमोठ्याने वाजवत त्यांच्यावर धावून गेले. हत्तींचा समूह आवाज ऐकून पिल्लाला खड्ड्यातच एकटे सोडून पळून गेला. त्याच वेळेला शेतकऱ्यांनी हत्तीच्या पिल्लाचा आवाज ऐकला. त्यांनी पिल्लासाठी वन विभागाकडून मदत मागितली. हत्तीच्या पिल्लाला चिखलातून वाचवता याव म्हणून विभागातील काही माणसे बुलडोजर घेऊन आले. ते पिल्लू पाय फेकून फेकून संघर्ष करत होते. शेवटी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्या पिल्लाला बाहेर काढले. प्राण्यांच्या डॉक्टरांनी त्या पिल्लाला तपासले. ते थकलेले, तहानलेले व घाबरलेले होते. परंतु जास्त जखमी नव्हते.

वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी हत्तीच्या समुहाला व पिल्लाच्या आईला शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु ते निघून गेलेले होते. कर्मचारी ओळखून होते की ते छोटे पिल्लू एकटे जंगलात जिवंत राहू शकत नाही. त्यांनी त्याला ट्रकमध्ये टाकले आणि आसाममधील वन्यजीवबचाव केंद्रावर घेऊन गेले.

बचाव केंद्रावर हत्तीच्या पिल्लांसोबत एक सुरक्षा रक्षक नेहमी राहत होता. कारण पिल्लाला हवे तेव्हा दूध पाजू शकेल. तो रात्री पिल्लांच्या जवळच झोपत होता. हथे हत्तींच्या पिल्लांना अन्न व पाणी शोधू शकतील म्हणून एकत्रच फिरवण्यासाठी नेले जात असे. ती छोटी हत्तीण इतर पिल्लांच्या परिवारातील सदस्य बनली. जेव्हा हे सारी पिल्ले मोठी होतील तेव्हा त्यांना परत जंगलात सोडले जाईल ज्यामुळे ते इतर समुहात जातील किंवा आपला समुह तयार करतील.




## एका कार्यपध्दतीचा स्विकार करा

- छोट्या हत्तीच्या दृष्टीकोनातून गोष्ट लिहा ज्यामध्ये हे सांगितले असेल की ती काय विचार करत होती किंवा तिला कसे वाटत होते.
- प्राण्यांना वाचवण्याबद्दलची आणखी माहिती एकत्र करा.
- वाचवण्याच्या कार्याचा अभिनय करा.
- बचाव केंद्राच्या रखवालदाराची एक काल्पनिक मुलाखत घ्या. यावर एका मित्रासोबत काम करा.
- वर्गासाठी एका मुलाखतीचा अभिनय करा.
- छोट्या हत्तीला वाचवण्यासंदर्भात वृत्तपत्रासाठी एक लेख किंवा ब्लॉग एंट्री तयार करा किंवा एक सचित्र कादंबरी तयार करा.



# पाठ ५ : संकटग्रस्त प्राण्यांसोबत तुलना

शिकण्याचा उद्देश: विद्यार्थी जंगलात प्राण्यांवर येणाऱ्या वेगवेगळ्या संकटांचा शोध घेतील आणि त्यांच्यामध्ये तुलना करतील. ते विभिन्न मार्गांनी माहिती एकत्र करतील. त्यांच मुल्यांकन आणि विश्लेषण करतील. आपल्या माहितीला ते आपल्या पध्दतीने लोकांपर्यंत पोहचवतील.

प्राण्यांवर येणाऱ्या संकटांची तुलना (सर्व वयाच्या/क्षमतेच्या विद्यार्थ्यांसाठी)

१. विद्यार्थ्यांना समुहात किंवा जोड्यांमध्ये विभाजित करा आणि हत्तींवर येणाऱ्या संकटांची यादी तयार करायला सांगा. या बरोबर अशी छोटी माहिती पण जोडा की येणार संकट हत्तींना कशा प्रकारे प्रभावित करत व त्यांना वाचवण्यासाठी काय प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थी हत्तींवर येणाऱ्या संकटाची यादी तयार करण्यासाठी पाठ्यसामग्रीची मदत घेऊ शकतात. त्यांना आठवण करुन द्या की ते व्हिडीओच्या माहितीचा सुध्दा उपयोग करु शकतात. यानंतर विद्यार्थ्यांच्या समुहाला एकत्र बसवून हत्तींवर येणाऱ्या संकटांची चर्चा करायला सांगा.

२. बोर्डवर खाली दिलेले शोधसंबंधी प्रश्न लिहा.

.....(प्राण्याच नाव) पण सर्वात मोठे संकट कोणते आहे? ते संकट प्राण्यांना कसे प्रभावित करतात. प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी काय केले पाहिजे?

नष्ट होणाऱ्या प्राण्यांच्या एका समुहाची निवड करा. ज्यांच्याबद्दल विद्यार्थी विस्तृत माहिती एकत्र करतील. हत्ती सारखेच हे प्राणी अवैध शिकार व दूसऱ्या संकटांचा सामना करीत आहेत. वाघ, व्हेल, पानघोडा, बिबट्या, हरिण, कासव, सांबर व अस्वल. बोर्डवर प्राण्यांचे नाव लिहा व ठरवा की किती विद्यार्थी प्रत्येक प्राण्यांची माहिती एकत्र करु शकतील. यानंतर प्राण्यांची नाव एक टोपीत टाकून विद्यार्थ्यांना तोपर्यंत शोधू द्या जोपर्यंत प्रत्येक प्राण्याची निवड होत नाही.

३. विद्यार्थ्यांच्या समुहाला सांगा की ते प्राण्यांची माहिती कोणत्या ठिकाणावरुन प्राप्त करु शकतील. त्यांना आईएफएडब्लू व डब्लूटीआई ची संकेतस्थळ बघायला सांगा.

४. विद्यार्थ्यांना प्राण्यांची माहिती एकत्र करणे, मुद्दे घेणे, तोंडी प्रस्तुती तयार करणे यासाठी वेळ द्या. त्यांना आपली माहिती, वर्गामध्ये चार्टवर या खाली दिलेल्या पध्दतीमध्ये ओवरहेड ट्रास्परेंन्सी प्रस्तुत करायला सांगा.

प्राणी ............. प्राणी कोठे आढळतात .............

संकट ............. या प्राण्यांना कसे प्रभावित करतात ............... काय केले जात आहे.

५. वैयक्तिक कार्य कलापामध्ये विविधता यावी हे दाखवण्यासाठी (तुलना करण्यासाठी) विद्यार्थ्यांना चार्ट बनवायला सांगा. पण त्याच सादरीकरण वेगळ्या प्रकारे करा जेणेकरुन प्राण्यांवर येणाऱ्या संकटांच नाट्यरुपात प्रस्तुतीकरण दिसेल.

६. प्रत्येक सादरीकरणानंतर विचारविनिमय करा की कोणत्या विशेष प्राण्यावर येणार संकट हत्तींवर येणाऱ्या संकटांपेक्षा कस वेगळ आहे किंवा समान आहे. त्याचबरोबर ते इतर प्राण्यांसोबत कस संबंधीत आहे, ज्याच सादरीकरण दुसऱ्या मुलांनी केल आहे. उदाहरणादाखल हत्ती व गेंडा यांच्यावर सारखंच संकट येत आहे. हत्तींना दातांसाठी तर गेंड्याला शिंगासाठी अवैध शिकारीच्या समस्येला तोंड द्याव लागत आहे. बिबट्या, वाघ, हरिण, यांची शिकार त्यांच्या कातडीसाठी होते. बिबट्या अनेक वेळेला चुकून माणसांच्या वस्तीत गेला की घाबरुन त्याला मारुन टाकल जातं. वाघाच्या शरीराचे अवयव व अस्वलाच्या पित्ताशयातुन निघालेलं पित्त अनेक औषधांमध्ये उपयोगात आणल जात. नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे बिबट्या, वाघ, हरिण व हत्तींचा सामना मनुष्यांसोबत होत असतो.

७. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये नैसर्गिक अधिवास नष्ट झालेल्या मुद्यांबद्दल विद्यार्थ्यांना सांगा. जसे की, अधिवास न राहिल्यामुळे प्राणी माणसांच्या संपर्कात येतात. गर्दीच्या संतापाचे शिकार होतात. संघर्षातून मरण पावतात. त्यांना विष दिले जाते, व हत्ती रेल्वेच्या रुळांवर येऊन मरण पावतात इत्यादी.

८. जेव्हा विद्यार्थी वेगवेगळ्या प्राण्यांच्या समस्यांच सादरीकरण करुन चर्चा करतील तेव्हा प्रत्येक समुहाला असा तक्ता बनवायला सांगा ज्यामध्ये त्यांनी निवड केलल्या प्राण्यांच्या समस्यांची तुलना हत्तींच्या समस्यांशी असेल. एक छोट उदाहरण इथं दिलं जात आहे.

| समस्या | हत्ती | हत्ती | व्हेल |
|---|---|---|---|
| अवैध शिकार | हत्तींचे दात | कातडी, औषधांसाठी शरीरांचे अवयव | - |
| निवासस्थान नष्ट होणे | माणसांच्या हालचाली हत्तींसाठी जागा कमी करतात व पाण्याच्या पारंपारिक स्त्रोतापर्यंत त्यांच्या रस्त्यांमध्ये अडचणी आणतात. विभागणीमुळे समुह वेगवेगळे पडतात. अनुवांषिक विविधता कमी होते व त्यांच्यात रोगराई वाढते | | पाण्यात वाहणाऱ्या जाळ्यामध्ये व्हेल फसते व त्यांच्या प्रवासाचे रस्ते बंद होतात. |
| माणसांशी संघर्ष | | | |
| पर्यावरणात बदल | | | |



IFAW



# पाठ ६ : चूक कोणाची आहे?

उद्देश : विद्यार्थी विचार-विनिमय व वाद-विवादाच्या माध्यमातून आपले विचार इतरांच्या समोर प्रकट करुन समजावून सांगतील. ते वेगवेगळ्या विचारांच्या आधारे तर्क प्रकट करतील त्यात असे विचार असतील जे त्यांना शोध व वाद विवादांच्या माध्यमातून मिळालेले असतील.

१. पाठ्य सामग्रीचा भाग ‟हत्तींसोबत अडचणी" मधून सीआईटीईएस च्या व्याख्येचा प्रयोग करुन वर्गाला त्यांच्या भूमिकेबद्दल सांगा. सीआईटीईएसच्या निर्णयांने हत्तींना कसे प्रभावित केले आहे, यावर विचार करा. अवैध शिकार व स्ट्रॉकपाइलिंग सारख्या शब्दावलीवर सुध्दा प्रकाश टाका. अवैध व वैध हस्तीदंताच्या विषयावर सुध्दा चर्चा करा. तुम्ही विद्यार्थ्यांना हत्ती व पर्यावरणातील त्यांचे महत्व यावर प्रथम वाचलेल्या पाठांच्या महत्त्वपूर्ण बिंदूवर चर्चा करायला सांगू शकतात.

२. हस्त पुस्तिका कार्यतक्ता-३ : वृत्तपत्रासाठी काल्पनिक लेख: हत्तींचे शिकार गुन्हेगार मानले गेले आहे. विद्यार्थ्यांना ते स्वत: वाचू द्या अथवा पूर्ण वर्गासोबत मोठ्याने वाचा.

३. विद्यार्थ्यांकडून पाठ्यसामग्रीबद्दल त्यांचे विचार व प्रतिक्रिया घ्या. तुम्ही खालील काही प्रश्नांचा उपयोग करु शकतात.
   - हत्तींना हस्तीदंतासाठी मारले जाते हे ऐकून त्यांना कसे वाटते?
   - त्यांच्या पिल्लांच काय होत असेल यावर ते कल्पना करु शकतात का?
   - वचीरु बद्दल त्यांचे काय विचार आहेत? त्याच्याबद्दल त्यांना काय माहित आहे?
   - जे त्याने केलं त्याबद्दल त्यांना कस वाटत?

४. वर्गाला छोट्या समुहात विभाजित करा. खाली दिलेल्या तक्त्यानुसार प्रत्येक समुहाला एक भूमिका द्या. ज्यामुळे ते अभिनयाची सामुहिक प्रक्रिया कोणाला दोष दिला पाहिजे? चूक कोणाची आहे? याची तयारी करु शकतील.

५. प्रत्येक समुहाला माहिती एकत्र करण्यासाठी व दिलेल्या कार्डच्या पत्रांच्या जीवनाचा अभिनय करण्यासाठी कल्पना करायला वेळ द्या.

६. प्रत्येक समुहाला वर्गात एक तोंडी सादरीकरण करायला सांगा की त्यांच्या भूमिकेसाठी हस्तीदंत आवश्यक का आहे आणि त्याला प्राप्त करण्यासाठी हत्तींना मारण्याची परवानगी का आहे?

७. अभिनयानंतर वर्गाला सांगा की ते खालील प्रश्नांवर विचार करतील. हस्तीदंताच्या व्यवसायासाठी कोण जबाबदार आहेत? वचीरुचे काय केलं पाहिजे? सीआईटीईएस ला हस्तीदंताच्या व्यवसायासाठी काय केलं पाहिजे?

८. हत्तींना वाचवण्यासाठी व हस्तीदंताच्या व्यवसायाला रोखण्यासाठी आपल्याकडून काहीतरी उपाय सूचवायला विद्यार्थ्यांना सांगा.

| अभिनय | विवरण |
|---|---|
| सरकारी मंत्री | मंत्री आपल्या येथील हस्तीदंत चे भंडार विकू इच्छितात कारण त्यातून अतिरिक्त पैसा मिळू शकतो. |
| वन्यजीव जंतूचा स्थानीय व्यापारी | व्यापारी अवैध शिकाऱ्यांकडून हस्तीदंत खरेदी करुन शहरातील व्यापाऱ्यांना विकतात. आपल्या परिवारातील सदस्यांच्या उदरनिर्वाहासाठी पैसा मिळवण्याच्या इच्छेने ते असे करतात. |
| हस्तीदंताचा चीनी कारागीर | कारागिर आपल्या परिवाराची शेकडो वर्षाची कलाशिल्पाची परंपरा पुढेही तशीच ठेवू इच्छितो. कारण त्यामुळे देशभर हस्तीदंताचे दागिने विकून पैसा कमवू शकेल. |
| अवैध शिकारी | अवैध शिकारी आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी व आपल्या मुलांना शाळेत टाकण्यासाठी हत्तींना मारुन त्यांचे दात विकतो. |
| लंडनमधील हस्तीदंत संग्रह करणारा धनीक | हस्तीदंतावर नक्षी केलेल्या दागिन्यांच्या लिलावासाठी ही व्यक्ति देशभर फिरत असते. ती व्यक्ती नक्षी आपल्यामध्ये एक फार मोठी कला आहे, अशी समजते आणि दागिन्यांना गुंतवणूक मानते. |
| महासचिव (सीआईटीईएस चा प्रमुख) | याला अनेक आफ्रिकी देश आपल्याबाजूने करण्याचा प्रयत्न करत आहेत,जे आपल्या ठिकाणावरील हस्तीदंताचे भंडार विकू इच्छितात. असे समजले जाते की तो निपक्ष राहणार. |

आईएफएडब्ल्यू : डब्ल्यूटीआईचा ॲनिमल एक्शन एज्युकेशन प्रोग्राम किंवा वन्यजीव कार्यान्वित शिक्षण कार्यक्रम आपल्या प्राथमिक व माध्यमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी विभिन्न शिक्षण, दिशा निर्देश, प्रशिक्षण व अन्य सामग्री एकत्रित करतो ज्यामुळे ते वन्यजीव व आपल्यामधील पर्यावरणाबद्दल माहिती व समज प्राप्त करुन विज्ञान, नागरिकशास्त्र, भूगोल, भाषा व कला क्षेत्रातील आपले शिक्षण पूर्ण करु शकेल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **बॉर्न टू बी वाइल्ड** | **वंडर वन स्काइ** | **बिनीथ द वॉटर** | **टू द रेस्क्यू** | **डांपदह ॲमे** |
| सेविंग द मैजेस्ट्रिक टाइगर | व्हाय ॲनिमल्स मॅटर | प्रोटेक्टिंग द मरी एनवायरमेंट | इमरजेंसी रिलीफ फॉर एनिमल्स | फॉर सील्स |



IFAW

# द डेली न्यूज

आईएफइल्यू प्रकाशन सप्टेंबर २०११



© IFAW/R. Sobol

## हत्तींची अवैध शिकार करणारा अपराधी समजला गेला.

एका २३ वर्षीय व्यक्तीला आज झवेरी जिल्हा कोर्टात हजर करण्यात आले. त्याच्यावर वन्यजीवन प्राधीकरणाने आक्षेप लावल आहे की तो एका मृत मादा हत्तीचे दात कापत असताना पकडला गेला. जेव्हा की एक शिशु हत्ती दु:ख आणि वेदनेने इकडून तिकडे धावत होता.
फरिकी कमाऊ या अधिकाऱ्याने कोर्टाला सांगितले की बेरोजगार व तीन मुलांचा वडील अभियुक्त अजुमा वचीरु याने या आधी वन्यजीवच्या एका अंडरकवर अधिकाऱ्यासमोर हस्तीदंत विकण्याचा प्रस्ताव ठेवला होता. वचीरु - ज्याला अपराधी समजले गेले त्याच्यावर या देशातील वन्यजीव कायद्यानुसार एक नष्ट होणाऱ्या प्रजातीच्या प्राण्याला मारणे व हस्तीदंताचा अवैध व्यापार करणे असे आरोप ठेवण्यात आले आहेत.
कमाऊ अधिकाऱ्याने सांगितले की, हा हत्ती हस्तीदंताच्या अवैध व्यापारामुळे जोगू नेशनल पार्क/अभयारण्यात प्रतिवर्षी मरण पावणाऱ्या ६० पेक्षा जास्त हत्तींपैकी एक होता.
त्यांनी सांगितले अजुमा वचीरुसारखे स्थानिक व्यक्ती हत्तींना मारुन बेकायदेशीर पध्दतीने



© R. van Aarde

दक्षिण पूर्व अफ्रिकेच्या बाजारात विक्रीसाठी आलेले हस्तीदंताची नक्षी व दागिने.

हस्तीदंताचा व्यापार करुन पैसे कमवण्याचा प्रयत्न करत आहेत. याचे कारण कंवेशन ऑन इंटरनेशनल ट्रेड इन ऐनडेंजर्ड स्पीशीज/ नष्ट होणाऱ्या प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर संमेलन (सीआईटीएस) चा २००९ चा तो निर्णय पण असू शकतो. ज्यामुळे पूर्वेकडील देशांमध्ये हस्तीदंताच्या मागणीला प्रोत्साहन मिळाले आहे.
त्यांनी हे पण सांगितले की या निर्णयाने त्या देशांना हस्तीदंत विकण्याची अनुमती दिली गेली ज्यांच्याकडे याचे भंडार आहे.

कारण कोणत्याही प्रकारे आपण सांगू शकत नाही की हस्तीदंताचा कोणता भंडार वैध आहे आणि कोणता भंडार अवैध मार्गाने हत्तींना मारुन मिळवला आहे. त्यामुळे अवैध शिकार करणाऱ्यांना हे कळले आहे की नि:संकोच ग्राहकांकडून पैसे

दक्षिण पूर्व आफ्रिकेच्या बाजारात विक्रीसाठी आलेले हस्तीदंताची नक्षी व दागिने.
हा हत्ती हस्तीदंताच्या अवैध व्यापारामुळे जोगू नेशनल पार्क/ अभयारण्यात प्रतिवर्ष मरण पावणाऱ्या ६० पेक्षा जास्त हत्तींपैकी एक होता.
फरिकी कमाऊ दक्षिण पूर्व अफ्रिकेच्या बाजारात विक्रीसाठी आलेले हस्तीदंताची नक्षी व दागिने.

कमवण्याचा हा चांगला मार्ग आहे.
हत्तींच्या संरक्षणासाठी वन्यजीवन प्राधिकरणासोबत काम करत असलेल्या आईएफएसडब्ल्यूच्या जाणकाराचे असे म्हणणे आहे की, हस्तीदंताच्या अवैध व्यापारामुळे जोग अभयारण्यातील हत्तींच्या जनसंख्येवर मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यांनी सांगितले की हत्तींवर या धोक्यामुळे पूर्ण क्षेत्रातील व येथील हत्तींच्या संख्येची स्थिती गंभीर बनत चालली आहे. या व्यतिरिक्त या क्षेत्रात हत्ती पर्यटकांचे प्रमुख आकर्षणाचे केंद्र आहे. जे येथील म णसांचे उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. हत्तींच्या न होण्याने येथील लोकांची स्थिती अजून खराब होऊ शकते.
वचीरुचे वकील थिओंगी ओडींगा ने सांगितले की वचीरुच्या गरिबीने त्याला हत्तीला मारण्यासाठी आणि हस्तीदंत विकण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांनी सांगितले की 'हत्तीला मारणे खरंच चूक आहे परंतू तो अभावग्रस्त असल्यामुळे आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह चांगल्या पध्दतीने करु शकत नाही.'
जोवारी जिल्ह्यात जास्त करुन माणसे ८४ शिलिंगवर दररोज वर जीवन जगत आहेत, एक डॉलर पेक्षाही कमी आणि उदरनिर्वाह करण्यासाठी आपल्या आजूबाजूला जे काही नैसर्गिक रुपात उपलब्ध आहेत त्यावरच अवंबून आहेत. एका वेळच्या जेवणासाठी आणि आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यासाठी जर ते कायदा तोडत असतील तर त्यात वाईट काहीच नाही.
वचीरुला आरोपी समजले गेले. त्याला उद्या दंड दिला जाईल. त्याला जास्तीत जास्त ६ म हिन्यांची शिक्षा व ६०० ते २००० शिलिंगपर्यंत दंड दिला जाऊ शकतो. (६ ते २३ अमेरिकी डॉलर)

IFAW